RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२४४ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.३० नोव्हेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## प्रकाश आंबेडकरांवर गुन्हा दाखल करुन अटक करा : नारायण राणे

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

राज्यात दंगली होऊ शकतात असं म्हणणारे वंचित आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करा, अशी मागणी केंद्रीय लघू सूक्ष्म आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांनी केली. ते पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते.

प्रकाश आंबेडकर म्हणतात दंगली होऊ शकतात. खरंच राज्यात अशी परिस्थिती आहे का? असा प्रश्न नारायण राणे यांना विचारण्यात आला. त्यावर राणे म्हणाले, त्यांच्यावर ऋखठ दाखल करून त्यांना अटक व्हायला पाहिजे. त्यांना अटक करायला पाहिजे आणि माहिती घ्यायला पाहिजे. दंगलीचा आधार सांगा.

नारायण राणे यांना पुन्हा त्याबाबतच विचारण्या आलं. त्यावर त्यांनी सावरासावरव केली. आंबेडकर असो किंवा इतर कोणीही, दंगलीविषयी बोलत असेल तर, पोलिसांनी त्यांच्याकडून माहिती घ्यायला हवी. त्यांची चौकशी करायला हवी. दंगली रोखण्यासाठी कारवाई करायला हवी, असं नारायण राणे म्हणाले.

### दंगलीबाबत बोलणाऱ्यांची चौकशी करा

प्रकाश आंबेडकर असो किंवा इतर कुणीही असो, जे कोणी दंगलीविषयी बोलत असतील, त्याची पोलिसांनी दखल घ्यावी, त्यांची चौकशी करायला हवी. दंगलीची त्यांच्याकडे काय माहिती आहे ती घेऊन दंगल रोखण्यासाठी कारवाई करावी.दंगल रोखण्यासाठी अटक देखील करायला हवी. प्रकाश आंबेडकर यांच्यावर एफआयआर दाखल करून, त्यांना अटक व्हायला पाहिजे. त्यांना अटक करून दंगलीचा आधार काय आहे याची माहिती घ्यायला पाहिजे, असं नारायण राणे म्हणाले.




### जरांगे वयाने लहान, त्यांनी अभ्यास करावा

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणाचा अभ्यास करावा. ते अजून वयाने लहान आहेत. मराठा समाज ओबीसीतून आरक्षण घेणार नाही, असा दावा नारायण राणे म्हणाले.

### संजय राऊत पुन्हा जेलमध्ये जाणार

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांकडे आक्रमकता आहे का? ते नाव घेऊ नका त्यांच्यावर प्रश्न विचारू नका. तो दुसरं कधी चांगलं काय बोलतो का? मी वाट पाहतोय शिंदे सरकार त्याचं संरक्षण कधी काढणार याची. संजय राऊत आदित्य ठाकरेसोबत आत जाणार आहे. तो सध्या जामिनावर बाहेर आहे. आदित्य ठाकरे सुशांत सिंह केसमध्ये आतमध्ये जाणार. तिथं संजय राऊतदेखील सोबत असतील, असा दावा नारायण राणेंनी केला.

### उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल

यावेळी नारायण राणे यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावरही हल्ला चढवला. उद्धव ठाकरे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन काय पैसे वाटणार आहे का?'मातोश्रीवर फक्त इनकमिंग आहे त्यांना आऊटगोईंग माहिती नाही.उद्धव ठाकरे यांच्याकडे आक्रमक व्हायला कोणी आहे का? आक्रमकवाले सगळे गेले दुसरीकडे.उद्धव ठाकरे गटात आहे कोण तो गट तरी आहे का? असा हल्लाबोल नारायण राणेंनी केला.

## स्वस्त धान्य दुकानदार महासंघाच्या मागण्या मंजूरच झाल्या नसल्याने

### १ जानेवारीपासून स्वस्त धान्य वाटप बंद

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

स्वस्त धान्य दुकानदारांच्या काही मागण्या आहेत. ज्या सरकारपुढे ठेवल्या आहेत. परंतु यावर अद्याप निर्णय होत नसल्याने स्वस्त धान्य दुकानदार महासंघाने रेशन वाटप बंद करण्याचा इशारा दिला आहे. ही वाटप नवीन वर्षात अर्थात १ जानेवारीपासून केली जाणार आहे.


ऑल इंडिया फेयर प्राईस डीलर फेडरेशन तसेच अखिल महाराष्ट्र स्वस्त धान्य दुकानदार केरोसीन परवानाधारक महासंघाच्यावतीने आंदोलन छेडले आहे. १ डिसेंबरला राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर स्वस्त धान्य दुकानदारांच्या मागण्या, अडचणी समस्यांबाबत एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. यानंतरही निर्णय न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा महासंघाने दिला आहे.

दरम्यान ऑल इंडिया फेयर प्राईस ऑफ डीलर फेडरेशनच्या वतीने देशभरातील सर्व स्वस्त धान्य दुकानदार १ जानेवारीपासून राज्यासह देशभरात स्वस्त धान्याचे वाटप करणार नाही. जोपर्यंत आपल्या मागण्यांच्या संदर्भात सरकार सहानुभूतीपूर्वक विचार करत नाही, तोपर्यंत राज्यातील व देशातील स्वस्त धान्य दुकाने बंद राहतील. अस राज्याचे स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे उपाध्यक्ष राजेश अंबुस्कर म्हटल आहे.

## छगन भुजबळ पनवती, त्यांच्यामुळे शेतकऱ्यांच्या मागेही साडेसाती लागेल; जरांगेची जहरी टीका

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक जालना**

राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, मंत्री छगन भुजबळ आज नाशिक जिल्ह्यातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी करत आहे. दरम्यान, भुजबळ यांच्या याच पाहणी दौऱ्याला मराठा आंदोलकांचा विरोध करण्यात येत आहे. तर, या सर्व घडामोडीवर मनोज जरांगे यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. छगन भुजबळ हे पनवती असून, त्यांच्यामुळे शेतकऱ्यांच्या मागे साडेसाती लागेल अशा शब्दात जरांगे यांनी भुजबळ यांच्यावर टीका केली आहे.



दरम्यान यावर बोलतांना जरांगे म्हणाले की, छगन भुजबळ पनवती आहे. उगाच शेतकऱ्यांच्या मागे साडेसाती लागेल. जो माणूस पायदळी कायदा तुडवतो, महापुरुषांच्या जाती काढतो, जो शेतकऱ्यांच्या लेकरांच्या विरोधात आरक्षण देऊ नका म्हणून बोंबलतो, घटनेच्या पदावर बसून जातीमध्ये तेढ निर्माण करतो, त्यामुळे त्याने शेतात जायला नको पाहिजे. उगाच त्या जमीनवाल्या शेतकऱ्यांच्या मागे साडेसाती लागेल. हा माणूस पनवती असल्यासारखा आहे. तसेच, मंत्री गेल्यावरच शेतकऱ्यांचं चांगलं होतं असे काही नाही. प्रशासन आहे ना, प्रशासनाने पंचनामे करायला पाहिजेत. हा माणूस तिथे जाऊन पंचनामे करतो का? आणखी शेतकऱ्याच्या शेतात जाऊन त्याची शेती तुडवतो, असेही जरांगे म्हणाले.

### भुजबळांचा नुकसानग्रस्त भागाचा दौरा

मंत्री छगन भुजबळ आज नुकसानग्रस्त भागाचा दौरा करत आहेत. नाशिक जिल्ह्यातील अनेक भागात झालेल्या नुकसानीची त्यांच्याकडून पाहणी करण्यात येत आहे. ज्यात, येवला तालुक्यातील कातरणी, सोमठा, निळखेडा गावात जाऊन पाहणी करणार आहे. सोबतच, निफाड तालुक्यातील वेळापूर, पिंपळगाव, वनसगव, थेटाळे गावात देखील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन भुजबळ पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहे.

### भुजबळांना मराठा आंदोलकांचा विरोध...

भुजबळांच्या दौऱ्याला मराठा समाजाने विरोध केला आहे. आम्ही नुकसान सोसू पण तुम्ही बांधावर येऊ नका, अशी भूमिका गावकऱ्यांनी घेतली. तसंच शासन दरबारी भांडून आम्हाला निधी उपलब्ध करुन द्या, पण आमच्या बांधावर येण्याचा अट्टाहास का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. इतकंच नाही तर सोमठानदेश गावात भुजबळ गो बॅकच्या घोषणा देखील देण्यात आल्या. त्यांच्या दौऱ्याला विरोध करणारे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. तर, भुजबळ गेलेल्या रस्त्यावर गोमूत्र शिंपून शुद्ध करण्यात आले.

## देवेंद्र फडणवीस हेच मराठा आरक्षणाचे जनक, चंद्रशेखर बावनकुळेंचे विधान

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक जळगाव**

राज्यात गेल्या काही दिवसांपासून मराठा आरक्षणाचा मुद्दा चर्चेत आहे. यावरून सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करताना दिसून येत आहे. यातच मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी विरोधकांवर आरोप करताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच मराठा आरक्षणाचे जनक असल्याचे विधान केले आहे.



२०१४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने आमचे सरकार पाडले नसते, तर भाजप सत्तेत आली नसती आणि मराठा आरक्षण देण्याचा प्रश्न तेव्हाच सुटला असता असे विधान माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केले होते. यावर चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, पृथ्वीराज चव्हाण यांनी मराठा समाजाला आरक्षण देण्याचा कधीही विचार केला नाही. तो विचार सर्वात आधी देवेंद्र फडणवीस यांनी केला.

मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी कायदा केला. पण, या नतद्रष्टांनी मराठा समाज कसा आर्थिक दुर्बल आहे, हे मांडण्याची पद्धत चुकवली. जेव्हा हे प्रकरण अंतिम टप्प्यात होते, तेव्हा हे नेते आणि तत्कालीन मुख्यमंत्री झोपी गेले होते का? असा सवाल करत चंद्रशेखर बावनकुळे यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून विरोधकांवर जोरदार टीका केली.

याचबरोबर, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार प्रयत्नशील आहे. तसेच, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत सर्वपक्षीय बैठकीत एकमत झाले आहे, असेही चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. दरम्यान, राज्यभरात मराठा आरक्षणासाठी रान पेटले आहे. मराठा आंदोल मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला २४ डिसेंबरचा अल्टीमेटम दिला आहे. त्याआधीच मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावं, यासाठी आता मराठा समाजाकडून सरकारवर दबाव वाढत आहे.

## अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार**

चांदुर बाजार तालुक्यातील फुबगाव, शिरजगाव अर्डक, माधान, ब्रा थंडी, शिरजगाव, वणी, सोनोरी गावातील शेतकरी यांना अवकानी पावसाने मोठा फटका बसला असून संत्रा कपाशी तूर हरभरा मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे या अवकानी पावसाने मोठ्याप्रमाणात हजेरी लावल्याने शेतकर्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाच्या अवकाळी पावसाने हीरावला आहे रविवारच्या रात्रीपासून सतत पाऊस पडत असल्याने शेतातील कपासी व तुरीचे पीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून बागायती पिकांचे सुद्धा मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पावसामुळे विक्री न झालेल्या संत्रांचे सुद्धा प्रचंड नुकसान झाले आहे. रविवार रात्रीपासून तर सोमवार पर्यंत या अवकाळी पावसाने शेतकरी मेटाकुटीला आला आहे .

## प्रफुल पटेल म्हणालेत... घड्याळ तेच, वेळ नवी...

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक कर्जत**

अजित पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसचं २ दिवसीय चिंतन शिबीर कर्जत इथं आयोजित केले आहे. तत्पूर्वी निवडणूक आयोगात शरद पवार आणि अजित पवार गटात खरी राष्ट्रवादी कुणाची हा वाद सुनावणीला आहे. मात्र बऱ्याचदा अजित पवार-शरद पवार एकत्र येतील अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू असते. त्यावर प्रफुल पटेल यांनी खुलासा केला आहे. अजित पवारांच्या नेतृत्वात पुढची वाटचाल काय असावी हे निर्धारित करण्यासाठी आम्ही एकत्र आलोय. घड्याळ तेच, वेळ नवी ही आमची टॅगलाईन आहे. दोन्ही गट एकत्र येणार असं अनेकांकडून दिशाभूल करण्याचं काम होतंय. पण आम्ही अजित पवारांच्या नेतृत्वातच काम करत आहोत आणि यापुढेही करणार आहोत हे आम्ही स्पष्ट करतो असं पटेल यांनी म्हटलं आहे.



प्रफुल पटेल म्हणाले की, निवडणूक आयोग घटनात्मक संस्था आहे. त्यांच्या कार्यवाहीवर भाष्य करणार नाही. आमच्या वकिलांचा युक्तिवाद बाकी आहे. आम्ही जो निर्णय घेतलाय त्यात कुठेही अडचण येणार नाही. निवडणूक आयोगाच्या सुनावणीत समोरच्यांकडे काही मुद्दे नाहीत त्यामुळे वेगळे मुद्दे मांडले जातायेत. ज्यांच्याकडे मुद्दे नसतात ते किरकोळ मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करतायेत. सुनावणीनंतर त्यांचे वकील कार्यकर्त्यासारखे ब्रिफ्रिंग करत असतात हे हास्यास्पद आहे. जे काही आहे ते सत्य बाहेर येणारच आहे.आम्हाला जे पुरावे द्यायचे होते ते आम्ही दिलेले आहेत. बाकीचे सगळे मुद्दे जे आज उपस्थित केले त्याचा खुलासा होणार आहे. आमची बाजू मांडण्यात अडचण वाटत नाही. आमच्या वकिलांना संधी मिळाली तर एकाच सुनावणीत सगळे मुद्दे आम्ही मांडू शकतो असं त्यांनी सांगितले.

## दिवाळीत 'समृद्धी महामार्ग'वरून विक्रमी वाहनांचा प्रवास

**दि. ३० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

सातत्याने अपघातांमुळे चर्चेत असलेल्या समृद्धी महामार्गावर दिवाळीत सर्वाधिक वाहनांनी प्रवास केल्याची माहिती पुढे येत आहे. ऑक्टोबरच्या तुलनेत नोव्हेंबरमध्ये दिवाळीच्या काळात पहिल्या २१ दिवसांमध्ये या महामार्गावर तब्बल १.१६ लाख जास्त वाहने धावली.



दिवाळीच्या काळात एकीकडे रेल्वेचे आरक्षण मिळण्यास अडचण येत असतानाच दुसरीकडे विमानाचेही तिकीट खूप महागले होते. त्यातच खासगी ट्रॅव्हल्स कंपन्यांनीही प्रवाशांच्या अडचणींचा लाभ घेण्यासाठी अव्वाच्या सव्वा प्रवास शुल्क घेऊन प्रवाशांची लूट केली. हा सगळा प्रकार बघता नागरिकांनी रस्ता मार्गे समृद्धीवरून घर वा नातेवाईकांचे घर गाठणे पसंत केल्याचे आकडेवारीवरून दिसत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एमएसआरटीसी) आकडेवारीनुसार १ ऑक्टोबर ते २१ ऑक्टोबर २०२३ दरम्यानच्या काळात समृद्धी महामार्गावरून २ लाख ६६ हजार वाहनांनी प्रवास केला.

### अपघात झाले कमी!

दिवाळीचा सणादरम्यान १ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर २०२३ दरम्यानच्या याच काळात या महामार्गावरून तब्बल ३ लाख ८२ हजार ४१६ वाहने धावली. त्यातही सर्वाधिक ३० हजार ५४३ वाहने ही केवळ १८ नोव्हेंबरला धावली. तर या काळात धावणाऱ्या वाहनांच्या तुलनेत येथे अपघातही कमी झाल्याचे सुखद चित्र असल्याचे एमएसआरटीसीच्या सूत्रांनी सांगितले. या विषयावर एमएसआरटीसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसी भ्रमणध्वनीवर संपर्कसाधण्याचा प्रयत्न केला असता होऊ शकला नाही.

## हिवाळी अधिवेशनाच्या कामकासाठी येणाऱ्या पाहुण्यांची जबाबदारी 'लालपरी'वर

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजाच्या निमित्ताने नागपुरात येणाऱ्या पाहुण्यांची जबाबदारी लालपरीवर आली आहे. त्यासंबंधाने 'ती' कामालाही लागली आहे. हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने मंत्रालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने नागपुरात येतात. यातील बहुतांश जणांची निवास व्यवस्था सिव्हील लाईन मधील सरकारी वसाहतीत केली जाते. अधिवेशनाच्या कामकाजाच्या निमित्ताने भल्या सकाळी ते विधानभवनात पोहचतात आणि काम संपल्यानंतर आपापल्या निवास व्यवस्थेच्या ठिकाणी जातात.



सकाळपासून उशिरा रात्रीपर्यंत हा क्रम सुरू असतो. यंदाचे हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरपासून सुरू होणार असले तरी मंत्रालयातील विविध विभागाचे कर्मचारी काही दिवसांपूर्वीच नागपुरात पोहचले आहेत. काहींचे आगमन सुरू आहे. त्यांनी आपापल्या विभागाच्या फाईल्स, कागदपत्रांचे गठ्ठेही आणले असून ते 'सेट' करण्याचे काम विधानभवनात सुरू झाले आहे. या सर्वांना निवास्थानाहून विधानभवनात आणण्याची आणि परत नेऊन सोडण्याची जबाबदारी एसटी महामंडळाच्या लालपरीवर सोपविण्यात आली आहे. त्यानुसार, तूर्त ८ बसेस मंत्रालयीन कर्मचाऱ्यांच्या सेवेत गुंतल्या आहेत. २६ नोव्हेंबरपासून त्यांची सेवा सुरू झाली असून, अधिवेशन संपण्यापर्यंत लालपरी ही जबाबदारी पार पाडणार आहे.

## संपादकीय ......

# पृथ्वीराजांचे जरतरचे अजब तर्कट

*महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी मराठा आरक्षणाचा प्रश्न यापूर्वीच सुटला असता, हे सांगताना एक अजब तर्कट मांडले आहे. पृथ्वीराज चव्हाण २०१० ते २०१४ या काळात तीन वर्षे दहा महिने मुख्यमंत्रीपदावर होते. विधानसभेच्या २०१४ च्या निवडणुकांच्या उंबरठ्यावर राष्ट्रवादी काँग्रेसने मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वातील आघाडी सरकारचा पाठिंबा काढून घेतला आणि राज्यात राष्ट्रपती राजवट लागली. आघाडी सरकार ही निवडणूक हरले आणि देवेन्द्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री झाले, हा इतिहास आहे.*

*याच घटनाक्रमात काही बाबी खुबीने समाविष्ट करून पृथ्वीराज चव्हाण यांनी त्यांच्या सोयीचे पण अजब तर्कट मांडले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्या सरकारचा पाठिंबा का काढला, हे सांगताना त्यांनी सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचाराकडे पुन्हा एकदा अंगुलीनिर्देश केला आहे. तो करताना या भ्रष्टाचाराच्या मागे राष्ट्रवादी काँग्रेसचे बडे नेते असल्याचेही त्यांनी अप्रत्यक्षपणे सूचित केले आहे. आपण सहकार खात्यातील भ्रष्टाचार दूर करण्याच्या दृष्टीने कडक पावले उचलली आणि राज्य सहकारी बँन्केवर कारवाई केली. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्या सरकारचा पाठिंबा काढून घेतला, असे चव्हाण यांचे म्हणणे आहे.*

*राष्ट्रवादी काँग्रेसने पाठिंबा काढल्यामुळे आघाडी सरकार निवडणूक हरले पण हा पाठिंबा काढला नसता तर आपले सरकार निवडणूक जिंकले असते. त्यामुळे पुन्हा सत्तेवर आल्यानंतर आपण मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवला असता, असेही चव्हाण यांनी सांगितले आहे. पण हे असत्य आहे. वास्तविक, चव्हाण मुख्यमंत्री असतानाच्या तीन वर्षे दहा महिन्यांच्या कार्यकाळात त्यांनी मराठा आरक्षण देण्यासाठी फारशी पावले उचलली नाहीत. त्यामुळेच निवडणुकीच्या तोंडावर निवडणुकीची अधिसूचना निघण्याच्या आधी चव्हाण यांच्या सरकारने मराठा आरक्षणाबाबतचा अध्यादेश काढला आणि तो काढण्याचा राजकीय हेतूही जनतेला समजल्यामुळेच आघाडी सरकार निवडणुका हरले, ही वस्तुस्थिती आहे. पण, जणू काही राष्ट्रवादी काँग्रेसने पाठिंबा काढल्यामुळेच आपण निवडणूक हरलो आणि त्यामुळेच मराठा आरक्षणाचा प्रश्न रेंगाळला, हे चव्हाण यांचे म्हणणे म्हणजे अजब तर्कटच म्हणावे लागेल.चव्हाण यांनी नवी दिल्लीत डॉ. मनमोहन सिंग यांच्या मंत्रिमंडळात २००४ पासून काम करताना आणि महाराष्ट्रात मुख्यमंत्रीपदी आल्यानंतरही शरद पवार यांना खच्चा करण्याचे प्रयत्न कायम केलेले आहेत. त्यामुळेच शरद पवार यांना मुख्यमंत्री असलेल्या पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर आमच्या फायलींवर सह्या करताना यांच्या हाताला लकवा मारतो, अशी टीका करण्याची वेळ आली होती. पृथ्वीराज चव्हाण यांनी सिंचन घोटाळ्याबद्दल श्वेतपत्रिका काढण्याची टूम काढून अजित पवारांवर मंत्रिपदाचा राजीनामा देण्याची वेळ आणली होती. किंबहुना, मुख्यमंत्रीपदीच्या तीन वर्षे दहा महिन्यांच्या कार्यकाळात पृथ्वीराज चव्हाण हेच शरद पवार, अजित पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या दृष्टीने शत्रू क्रमांक एक असतील, इतकी हानी चव्हाण यांनी पवार यांना राजकीयदृष्ट्या पोहोचवलेली आहे. त्यामुळे आजही ते मराठा आरक्षणावरील विधान करताना पुन्हा एकदा शरद पवार तसेच अजित पवार आणि त्यांचे पाठीराखे, अनुयायी यांच्याबद्दल संदेह निर्माण करण्याचाच प्रयत्न करत आहेत.*

# बोगद्यातून बाहेर काढलेल्या कामगारांच्या गावात दिवाळी, गावागावात फटाक्यांची आतषबाजी

## सुटकेनंतर कामगारांनी पंतप्रधान मोदींना सांगितले अनुभव



**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक उत्तरकाशी** – ऐन दिवाळीच्या दिवशी आमच्यापुढे जणू मृत्यूच्या रूपातच बोगद्याचा भाग कोसळला आणि जगापासून आमचा संपर्क तुटला. १७ दिवसांपासून आमच्या सुटकेसाठी प्रयत्न सुरू असले, तरी आम्ही कधीही आशा सोडली नव्हती. परदेशात अडकलेल्या भारतीयांना सरकार सोडवू शकते, तर आम्हाला का नाही? हा विश्वास आम्हाला होता. मनोधैर्य राखण्यासाठी नियमित योगा तसेच आतल्या आत पायी चालत होतो, असे अनुभव बोगद्यातून सुटका झालेल्या कामगारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी शेअर केले.

बोगद्यातून सुरक्षित बाहेर पडल्यावर कामगारांनी पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी आणि बचाव पथकांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. मंगळवारी रात्री उशिरा बचावलेल्या कामगारांशी त्यांच्या दूरध्वनी संभाषणात मोदी त्यांना म्हणाले, इतके दिवस धोक्यात राहून सुखरूप बाहेर आल्याबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो. जर काही वाईट घडले असते तर आम्ही ते कसे घेतले असते हे सांगता येत नाही. तुम्ही सर्वांनी खूप धैर्य दाखवले आणि एकमेकांना प्रोत्साहन दिले. कामगारांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी पंतप्रधानांनी शुभेच्छा दिल्या. तसेच 'भारत माता की जय'चा नारा देत संभाषणाचा समारोप केला.

उत्तराखंडच्या सिलक्यारा बोगद्यात अडकलेले कामगार तब्बल १७ दिवसांनी मंगळवारी रात्री बोगद्यातून सुरक्षित बाहेर पडल्यानंतर त्यांच्या त्यांच्या कुटुंबीयांमध्ये आणि गावकऱ्यांमध्ये आनंदाचे उधाण आले असून, गावांमध्ये बुधवारीही एकमेकांना मिठाई खाऊ घालून दिवाळीसारखा आनंद साजरा करण्यात आला.उत्तर प्रदेशातील आठ मजूर बोगद्यात अडकले होते. राम मिलन यांचा मुलगा संदीप कुमार यांनी सांगितले की,



मंगळवारी रात्री बोगद्यातून कामगार बाहेर पडल्याची पहिली बातमी मिळताच लोक 'सर्व चांगले झाले' असे म्हणत घराबाहेर पडले. रात्री उशिरापर्यंत फटाक्यांची आतषबाजी सुरू होती, लोकांनी दिवे लावून आणि एकमेकांना मिठाई खाऊ घालून 'दिवाळी' साजरी केली.

**आम्ही भावासारखे एकत्र होतो...**

बिहारमधील कामगार सबा अहमद यांनी पंतप्रधानांना सांगितले की, आम्हाला कोणतीही भीती किंवा चिंता वाटली नाही. आम्ही भावासारखे एकत्र होतो. रात्रीच्या जेवणानंतर आम्ही बोगद्यात फेरफटका मारायचो. मी त्यांना मॉर्निंग वॉक आणि योगा करायला सांगायचो.

**सर्वांची प्रकृती उत्तम**– सिलक्यारा बोगद्यातून सुटका करण्यात आलेल्या कामगारांना बुधवारी आरोग्य तपासणीसाठी एम्स–ऋषिकेश येथे नेण्यात आले. त्यासाठी चिनुक हेलिकॉप्टरमधून त्यांना एअरलिफ्ट करण्यात आले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. कामगारांना बाहेर काढल्यानंतर चिन्यालिसौर येथील रुग्णालयात वैद्यकीय निरीक्षणाखाली ठेवण्यात आले होते.

### थरारक सुटकेवर जग काय म्हणते?

– लंडन : बोगद्यात अडकलेल्या ४१ कामगारांना वाचवण्याचे अविश्वसनीय आणि जोखमीचे यशस्वी ऑपरेशन पूर्ण झाल्याबद्दल जागतिक माध्यमांनी कौतुक केले आहे. मानवी श्रम मशिन्सवर भारी पडले, असे माध्यमांनी म्हटले आहे.

– 'द गार्डियन' या वृत्तपत्राने लिहिले की, शेवटी हा मानवी कामाचा यंत्रांवर झालेला विजय होता, कारण 'रॅट होल मायनिंग' तज्ज्ञांनी यंत्रे हतबल ठरल्यानंतर हाताने खोदून ढिगारा मोकळा केला. अनेक अडथळ्यांवर मात करून मोठ्या बचाव मोहिमेत त्यांना बोगद्यातून बाहेर काढण्यात आले, असे बीबीसीच्या वृत्तात म्हटले आहे.

– लंडनमधील 'द टेलिग्राफ' या वृत्तपत्राने आपल्या बातमीत म्हटले की, हे मिशन पूर्ण करण्यासाठी लष्करी अभियंते आणि खाण कामगारांनी ढिगाऱ्यात 'रॅट होल ड्रिल' केले. फ्रान्स २४नुसार रॅट होल खाण तज्ज्ञांनी हाताने खोदकाम करून ऑपरेशन यशस्वी करण्यात मदत केली.

# ओझर येथे मंदिर–संस्कृतीच्या रक्षणार्थ द्वितीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषद'

## अमरावती जिल्ह्यातून ४४ हून अधिक मंदिरांचे विश्वस्त रहाणार उपस्थित !

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – ५मंदिरे ही हिंदु धर्माची आधारशीला आहेत. त्यातून मिळणार्या ईश्वरी चैतन्यामुळेच आधुनिक काळातही समाज मंदिरांकडे आकर्षित होतो. त्यामुळे मंदिरांतील पावित्र्याचे रक्षण करणे, हे हिंदु समाजाचे दायित्व आहे. मंदिरातील देवतातत्त्व टिकवण्यासाठी मंदिरांत विधीवत पूजा–अर्चा करणे, प्राचीन मंदिर–संस्कृतीचे संवर्धन करणे, मंदिरांच्या समस्यांचे निवारण करणे, मंदिरात येणार्या भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करून देणे, दर्शनरांगांचे सुनियोजन करणे, तसेच मंदिर परंपरांचे रक्षण करणे यांसाठी मंदिरांचे विश्वस्त, पुजारी, भक्त आदींचे संघटन आवश्यक आहे. त्यासाठी श्री विघ्नहर गणपति मंदिर देवस्थान, लेण्याद्री गणपती मंदिर देवस्थान, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान, हिंदु जनजागृती समिती आणि महाराष्ट्र मंदिर महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने २ आणि ३



विघ्नहर सभागृह, ओझर, जिल्हा पुणे येथे द्वितीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे'चे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेला संपूर्ण महाराष्ट्रातून ५५० हून अधिक निमंत्रित मंदिराचे विश्वस्त, प्रतिनिधी, पुरोहित, मंदिरांच्या रक्षणासाठी लढा देणारे अधिवक्ते, अभ्यासक आदी सहभागी होणार आहेत, अशी माहिती हिंदु जनजागृती समितीचे श्री. नीलेश टवलारे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी पत्रकार परिषदेला १००८ पीठाधिश्वर श्री. शक्तीजी महाराज, हिंदु जनजागृती समितीचे श्री. नीलेश टवलारे, मंदिर महासंघाचे प्रतिनिधी श्री. अशोक पाखोडे, श्री. पिंगळादेवी संस्थानचे श्री. आशिष मारूडकर हेही उपस्थित होते.

या वेळी मंदिर महासंघाचे श्री. अनुप जयस्वाल पुढे म्हणाले, ''जळगाव येथे पहिल्या 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे'त 'महाराष्ट्र मंदिर महासंघा'ची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर महासंघाचे कार्य उत्तरोत्तर वाढत असून केवळ ४ महिन्यांमध्ये ते संपूर्ण राज्यभर पोचले आहे. महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यात केवळ ९ महिन्यांत २४० मंदिरांमध्ये वस्त्रसंहिता लागू करण्यात आली आणि दिवसेंदिवस त्यात वाढ होत आहे. ... महाराज म्हणाले की, मंदिरांवर होणारे आघात आणि मंदिर संस्कृतीच्या रक्षणासाठी मी मंदिर महासंघाच्या कार्यात सोबत आहे आणि ओझर येथे उपस्थित रहाणार आहे.

या परिषदेला 'हिंदु फ्रंट फॉर जस्टिस'चे प्रवक्ते आणि सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता विष्णुशंकर जैन, 'झी' २४ तास या वृत्तवाहिनीचे संपादक श्री. नीलेश खरे, यांसह श्री अष्टविनायक मंदिरांचे विश्वस्त, महाराष्ट्रातील जोतिर्लिंग देवस्थानांचे विश्वस्त, संत पिठांचे प्रतिनिधी, यासह देहूचे संत तुकाराम महाराज मंदिर, पैठणचे नाथ मंदिर, गोंदवले येथील श्रीराम मंदिर, रत्नागिरी येथील गणपतीपुळे मंदिर, श्री एकवीरा देवी मंदिर, अंमळनेर येथील मंगळग्रह मंदिर आदी मंदिरांचे विश्वस्त, सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस, हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे आदी मान्यवर सहभागी होणार आहेत. या मंदिर परिषदेत मान्यवरांचे मार्गदर्शन, मंदिरांशी निगडीत विविध विषयांवर चर्चासत्रे होणार आहेत. यामध्ये 'मंदिरे सनातन धर्मप्रचाराची केंद्रे बनवणे', 'मंदिरे सरकारीकरण मुक्त करणे', 'वक्फ कायद्या'द्वारे मंदिरांच्या भूमीवर अतिक्रमण आणि मंदिरे बळकावणे यांवर उपाय, मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे यांच्या परिसरात मद्य–मांस बंदी; दुर्लक्षित मंदिरांचा जीर्णोद्धार आदी विषयांवर चर्चा होणार आहे. ही परिषद केवळ निमंत्रितांसाठी असून यामध्ये सहभागी होण्यासाठी ७०२०३८३२६४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मंदिर महासंघाने केले आहे.




## मुलांच्या शारीरिक आरोग्यासह मानसिक आरोग्यही महत्त्वाचे

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**– सगळेच पालक लक्ष देतात. मात्र, त्यांच्या मानसिक आरोग्याकडे म्हणावे तसे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे त्यांच्या मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष होत असते. लहान मुलांच्या मुलांच्या शारीरिक आरोग्यासह मानसिक आरोग्यही महत्त्वाचे असल्याचे डॉक्टर सांगतात.

दैनंदिन जीवनातील विविध घटक मुलांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करतात. ज्या घरात सततची भांडण, आरडाओरड, नातेसंबंधात कटूता आढळते अशा मुलांना चिंता, नैराश्य, वर्तणुकीशी संबंधित समस्या आणि नैराश्याचा सामना करावा लागतो. घरच्यांकडून शैक्षणिक अपेक्षांच्या ओझ्यामुळे चिंता आणि तणावाची भावना निर्माण होऊ शकते. सोशल मीडिया आणि तंत्रज्ञानामुळे विविध आव्हानांना सामोरे जावे लागत आहे, ज्यामुळे मुलांमध्ये सायबर क्राईम आणि नकारात्मकता सारख्या समस्यांचे प्रमाण वाढले. दिवसेंदिवस स्क्रीन टाइम वाढत असून मैदानी खेळांपासून तसेच शारीरीक हलचालींपासून मुलं दूर राहत असल्याची बाब समोर येत आहे.

पालकांनी मुलांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे. चिडचिड, सामाजिक सहभाग कमी होणे किंवा मूड स्विंग्ज सारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष करु नये, असे बालरोग तज्ज्ञ डॉ दीपक उगरा यांनी सांगितले. अशा प्रकारची लक्षणे आपल्या मुलाला मानसिक आधाराची गरज असल्याचे सूचित करतात. चिंता किंवा नैराश्य यासारख्या मानसिक आरोग्य समस्यांची देखील लक्षणे दिसून येतात. शैक्षणिक गुणवत्तेत होणारी घट किंवा त्यांनी एकदा उपभोगलेल्या क्रियांमधील रस कमी होणे हे देखील धोक्याचे संकेत देत असल्याचे त्यांनी सांगितले. खाण्याच्या आणि झोपण्याच्या पद्धतींमध्ये होणारा बदल, वारंवार डोकेदुखी किंवा पोटदुखी हे देखील आपले मुल तणावाचा सामना करत असल्याचा संकेत देत असल्याचे डॉ. उगरा




यांनी म्हटले.

**मुलांना तणावाचा सामना करण्यास पोषक वातावरण कसे तयार कराल?**– आपल्या मुलांना निर्णय घेण्याची संधी देणे त्यांच्यावर विश्वास दर्शविल्या तसेच त्यांना त्यांचे विचार आणि भावना व्यक्त करण्यास प्रोत्साहित केल्याने त्यांना सुरक्षितता आणि आपलेपणाची भावना वाढीस लागते. तणाव आणि आव्हानांना सामोरे जाताना सकारात्मक वर्तन अंगीकारणे आवश्यक आहे. नियमित शारीरिक हालचाल, पौष्टिक आहार आणि पुरेशी झोप यांचा समावेश असलेली दिनचर्या तयार केल्याने मुलाच्या सर्वांगीण आरोग्यास हातभार लागतो. श्वासोच्छवासाचे व्यायाम किंवा ध्यानधारणा केल्याने मुलांना तणावपूर्ण परिस्थितीचा सामना करण्यास मदत होऊ शकते. पालकांनी स्क्रीन टाईमकडे लक्ष देणे आवश्यक आहे. शारीरिक आणि सामाजिक विकासास प्रोत्साहन देणाऱ्या कृतींना प्रोत्साहन द्यावे. त्यांना मैदानी खेळ खेळण्यास प्रोत्साहित करावे.निरोगी सवयी जोपासताना पालकांनी मुलांना त्यांच्या स्क्रीन टाईमबद्दल माहिती देणे तसेच योग्य निवडीबाबत मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. मुलांमधील शैक्षणिक ताणतणाव दूर करण्यात मदत करण्यासाठी पालकांद्वारे मुक्त संवाद साधणे आवश्यक आहे. पालकांनी मुलांच्या भावना जाणून घेणे, त्यांना भावनिक आधार देणे आणि कठीण परिस्थितीतही हार न मानता लढण्यास शिकविणे गरजेचे आहे.

# मेळघाटच्या राणी तंबोलीत पांढऱ्या कावळ्याचे दर्शन

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक धारणी**– गावासाठी शुभसंकेत, गावकऱ्यांना आश्चर्याचा धक्का धारणी : निसर्गाच्या विविध रंगासाठी प्रसिद्ध असलेल्या मेळघाटात जैवविविधता नेहमीनिसर्गप्रेमींसाठी आकर्षणाचा केंद्र ठरते. अशातच दोन दिवसांपूर्वी जगभरात दुर्मिळ असलेल्या पांढऱ्या कावळ्याचे जवळच्याराणीतंबोली गावात, मस्तवालपणे फिरताना दिसल्याने गावकऱ्यांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. पांढरी घार, सर्प गरुड, मेळघाटचे नवल आहे. चांदी अस्वल, कृष्ण शिर्ष साप आणि अनेक दुर्मिळ वन्यजीवांसाठी ओळखल्या जाणाऱ्या राणीतंबोली गावात प्रमिलाशंकर कास्देकर नावाच्या महिलेच्या घराजवळपांढराशुभ्रकावळा खेळत असल्याचे बघितले. यावेळी गावातील अनेक आदिवासींना या पांढऱ्या कावळ्याचे दर्शन झाले. यापूर्वी राणी तंबोली गावात पांढऱ्या कावळ्याचे दर्शन झाले नव्हते.



# डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालयातील डॉक्टरांना 3 रक्तवाहिनी बायपास शस्त्रक्रियेमध्ये यश

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२५ व्या जयंती उत्सवा' निमित्त रुग्णालयात कार्डियाक शिबिर आयोजीत करण्यात आलेले आहे. दि २१/११/२०२३ रोजी कार्डियाक शिबिरा अंतर्गत ७६ वर्षीय रुग्ण रुग्णालयामध्ये हृदय विकाराच्या आजारानिमित्य भरती झाला. डॉक्टरांद्वारे रुग्णाच्या तपासणी दरम्यान अँजिओग्राफी करण्यात आली. रुग्ण ट्रिपल वेस्सेलच्या आजारांनी ग्रस्त असल्याचे निर्दशनास आले, म्हणजे रुग्णाच्या हृदयापर्यंत जाणाऱ्या तीन रक्तवाहिनीचा रक्तप्रवाह कमी होत होता. रुग्णालयातील उतढड सर्जन डॉ. विवेक लांजे यांनी रुग्णाच्या आजाराची गंभीरता लक्षात घेऊन डूर्रिी शस्त्रक्रिया (उ–इत्रः) करण्याचे ठरविले. दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी ७६ वर्षीय रुग्णाच्या डूर्रिी शस्त्रक्रियेत (तीन रक्तवाहिनी) डॉ.विवेक लाजे, उतढड सर्जन व त्यांचे चमु यांनी तब्बल ६ तास कठीण परिश्रम घेऊन यश मिळविले. सदर शस्त्रक्रिया कार्डियाक शिबिरा अंतर्गत विनामुल्य करण्यात आली. ट्रिपल वेस्सेल डूर्रिी शस्त्रक्रिया (उ–इत्रः) हि पहिल्यांदाच डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये करण्यात आली असुन यशस्वी रित्या पार पडली. या शस्त्रक्रिये मध्ये डॉ. विवेक लांजे यांना डॉ.पटेल व नर्सिंग स्टाफ यांचे सहकार्य लाभले. हृदय विकारांशी संबंधीत रुग्णांनी रुग्णालयात सुरु असलेल्या कार्डियाक शिबिराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घेण्याचे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांनी केले आहे.




दै.विदर्भ प्रजासत्ताक अंक नि:शुल्क पाहिजे असल्यास आम्हाला तुमच्या नावासह टेक्स मेसेज किंवा व्हाट्सअप करा आमचा मो.नंबर ८६२४९८५६३३ संपर्क करा.

# एडतकरांना उतारवयात गजणीसारखे धक्के येतात, गांभीर्याने घेण्याची गरज नाही

## डॉ.बोंडे यांच्यावरील टीकेला नकुल सोनटक्के यांचे चोख प्रत्युत्तर





**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** काँग्रेस पक्षातील निवडकांचा अपवाद वगळता काडीचीही किंमत नसलेले ड.दिलीप एडतकर हे अमरावतीचे संजय राऊत असून सकाळी उठल्या-उठल्या त्यांची डराव डराव सुरू होते. यात त्यांचाही दोष नाही. उतारवयात असे गजनीसारखे तीव्र धक्के येणे साहजिकच असतात. त्यामुळे राज्यात, अमरावतीत काय सुरू आहे याचे भान त्यांना स्मृतीभंशाअभावी राहत नसल्याची जोरदार टीका भाजपच्या जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य नकुल सोनटक्के यांनी केली आहे. एडतकर यांनी तिवसा येथील घटनाक्रमावरून कायदा व सुव्यवस्थेच्या मुद्यावरून राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस व डॉ.अनिल बोंडे यांच्यावर टीका केली होती. त्याला सोनटक्के यांनी चोख प्रत्युत्तर दिले आहे.

राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे हे तिवसा येथे शंकरपट पाहण्याकरिता गेले होते. दरम्यान अज्ञातांनी त्यांच्यावर दगडफेक केल्याची घटना घडली होती. यानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ता दिलीप एडतकर यांनी राज्यात कायदा व सुव्यवस्थेचे ढींडवळे निघाले आहेत. खासदार सुरक्षित नसतील तर सामान्य जनता काय सुरक्षित असेल असा आरोप केला होता. या आरोपाला प्रतिउत्तर देताना भाजपच्या जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य नकुल सोनटक्के यांनी दिलीप एडतकर यांच्यावर जोरदार शरसंधान साधले आहे. 'ज्याची खावी भाकरी त्याची करावी चाकरी' या युक्तीप्रमाणे एडतकर हे आपल्या मूळ विचारधारेपासून भरकटले आहेत. यशोमती ठाकूर यांची चाकरी करण्यात ते सध्या पराकोटीचे व्यस्त आहेत. ज्याप्रमाणे, मुंबईत संजय राऊत सकाळी उठून महायुतीमधील नेत्यांना टार्गेट करत असतात. त्याचप्रमाणे दुसरे संजय राऊत सध्या अमरावतीत तयार होत असल्याचे पाहायला मिळत आहे. संजय राऊतांना राज्यात काडीचीही किंमत नाही. तशी गत सध्या अमरावतीत दिलीप एडतकर यांची काँग्रेस पक्षात झालेली आहे.

मध्यंतरी ऐकल्याप्रमाणे अधून-मधून त्यांची प्रकृती ही अत्यावस्त होत असते. त्यामुळे, महायुतीच्याविरुद्ध त्यांना अधून-मधून गजनीसारखे तीव्र धक्के येत असतात. हे धक्के आल्यावर राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्यसभेचे खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्याविरुद्ध ते गरळ ओकत असतात. ती ओकताना आपण काय बोलतो आहे? राज्यातील सध्या स्थिती काय आहे? महाविकास आघाडी सरकारच्या काळात काँग्रेस नेत्यांनी किती पाप केले, याचे भान त्यांना स्मृतीभंशाअभावी राहत नाही. संजय राऊत यांना ज्याप्रमाणे कोणीही गांभीर्याने घेत नाही तसेच यांनाही गांभीर्याने घेण्याची गरज नाही. अशी टीका करत नकुल सोनटक्के यांनी दिलीप एडतकर यांनी विनाविलंब नामांकित वैद्यकीय तज्ञांचा सल्ला घ्यावा व आपली प्रकृती ठणठणीत करावी, असे देखिल प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून युवा मोर्चाच्या जिल्हा कार्यकारिणीचे प्रसिद्धी प्रमुख ऋषिकेश इंगळे-पाटील कळविले आहे.

# सराफा व्यावसायिकाच्या हत्येचे रहस्य उलगडले

## घरी गवंडी काम करणाराच मारेकरी



**दि३० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** जिल्ह्यात खळबळ उडविणार्या तिवसा येथील सराफा व्यवसायिक संजय मांडळे यांच्या हत्येचे व जबरी चोरी प्रकरणाचे रहस्य उलगडण्यात अमरावती पोलिसांना यश आले आहे. मांडळे यांच्या घरी गवंडी काम करणाराच मारेकरी आहे. चोरीचा मुद्देमाल जप्त करून आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी या प्रकरणात वेगाने कारवाई केली.

रोशन दिगांबर तांबटकर (वय २५, रा. देऊरवाडा, ता. आर्वी, जि. वर्धा) असे अटकेतल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणात संजय मांडळे यांची मुलगी वैष्णवी हीने पोलिसात तक्रार दिली होती. त्या तक्रारीच्या आधारावर पोलिसांनी तपास सुरू केला. त्या तपासातून जी माहिती समोर आली ती आज पत्रकारांना सांगण्यात आली. मागील ३-४ महीन्यांपासून मांडळे यांच्या घराचे नुतनीकरणाचे काम सुरू असल्याने दररोज त्यांचेकडे गवंडी काम करणारे मजुर कामावर येत होते. या मजुरांसोबत व रोशन तांबटकर यांच्याशी सुध्दा संजय व त्यांच्या मुलाची चांगली ओळख झाली होती. दरम्यान रोशनला संजय मांडळे हे सोमवारी घरी एकटेच असतात तसेच ते घरून सराफा व्यवसाय करतात यांची माहीती होती.

सोमवार २७ नोव्हेंबर रोजी संजय वगळता मांडळे कुटुंबीय हे रुग्णालयात गेल्याची खात्री केल्यानंतर रोशन सायंकाळी ६ वाजता संजय यांच्या तिवसा येथील घरी दारू प्राशन करून आला. त्याने मजुरीच्या पैश्यापेक्षा अधिक पैश्याची मागणी त्याने संयज यांच्याकडे केली. त्यांनी जादा पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपी रोशन हा नाराज झाला. घराबाहेर पडला व खालील मजल्यावर सुरू असलेल्या बांधकामावरील कुदळीचा दांडा घेवून परत संजय यांच्याकडे वरच्या मजल्यावर आला. त्यांना सोप- सुपारी खाण्यास मागीतली. त्यांनी सोप-सुपारी दिली व परत पानपुडा ठेवण्यासाठी वळले असता आरोपीने दरवाज्याचे बाजुने लपवून ठेवलेल्या कु-हाडीचे दांडयाने संजय यांच्या डोक्यावर मागच्या बाजुने जबरदस्त प्रहार केले.

त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर रोशन याने आतील खोलीतील रोख रक्कम, सोन्या - चांदीचे दागीने घेवून घटनास्थळावरून मोटार सायकलने पळ काढल्याचे त्यानेच पोलिसांना सांगितले आहे. गुन्ह्याची कबुली त्याने दिली आहे. त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी ३० हजार, गुन्ह्यात चोरी गेलेले सोने १२० ग्रॅम व नगदी १२ हजार असा एकुण ७ लाख ७५ हजाराचा माल जप्त करण्यात आला आहे. गुन्हयाचा तपास तिवसा पो.नि. प्रदीप ठाकुर आहे. उर्वरीत मुद्देमालही जप्त करण्यात येणार आहे. ही कारवाई पोलिस अधिक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधिक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलिस अधिकारी सचिन्द्र शिंदे यांच्या मार्गदर्शनात पो.नि किरण वानखडे, प्रदीप ठाकुर, स.पो.नि. सचिन पवार, पो.उप.नि. नितीन चुलपार, संजय शिंदे , मो . तस्लीम , मुलचंद भांबुरकर यांच्यासह गुन्हे शाखेच्या सर्व पोलिस अमंलदारांनी केली.

# मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम

## मतदार यादीतील तक्रार भ्रमणध्वनीवर नोंदवा



**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,–** भारत निवडणूक आयोगाने दि. १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. कार्यक्रमाअंतर्गत मतदार यादीच्या कार्यक्रमावर नियंत्रण ठेवण्याकरीता मतदार निरीक्षक म्हणुन विभागीय आयुक्त यांची नेमणुक राज्य मुख्य निवडणुक आयोगाने केली आहे. मतदारांना मतदार यादीबाबत काही तक्रारी असल्यास भ्रमणध्वनी क्रमांक ९२०९१८११३८ वर तक्रार नोंदवावी, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी केले आहे.

विशेष पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत दि. ९ डिसेंबर २०२३ पर्यंत विधानसभा मतदार संघ व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या स्तरावर मतदार नोंदणी अर्ज स्विकारणे, मतदार यादीतील नावे वगळणे, मतदार यादीतील नोंदीदुरस्ती करणे इत्यादी कामकाज करण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांची नेमणुक करण्यात आली आहे. मतदार केंद्रावर केंद्रस्तरीय अधिकारीमार्फत फार्म क्र. ६, ६-, ७, ८ चे फार्म स्विकारण्यात येत आहे. अमरावती जिल्ह्यात मतदार नोंदणी करीता दि. २ व ३ डिसेंबर २०२३ रोजी विशेष शिबीर राबविण्यात येत आहे.मतदार यादीच्या कार्यक्रमावर नियंत्रण ठेवण्याकरीता मतदार निरीक्षक यांची नेमणुक करण्यात आली असून अमरावती जिल्ह्यातील मतदान केंद्रावर भेटी देवून काही मतदान केंद्राची पाहणी केली. यावेळी मतदान केंद्रावरील मतदाराकरीता आवश्यक असलेल्या सोयीबाबत चौकशी करुन मतदार नोंदणी अधिकारी यांना आवश्यक सुचना दिल्यात. तसेच जिल्ह्यातील मतदार यादी अचुक तयार करण्याच्या सुचना विभागीय आयुक्तांनी दिल्या.



# वाठोडा शुक्लेश्वरमध्ये दर १० दिवसाआड पाणी

## संतोष महात्मे आक्रमक

### मजीप्रा वर धडकत दिला टाकीवर चढून आंदोलन करण्याचा इशारा

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक वाठोडा शुक्लेश्वर–** वाठोडा शुक्लेश्वर येथील वार्डामध्ये पाणी पुरवठा होत नाही. संपूर्ण गावा मध्येच दहा दिवसा नंतरपाणी पुरवठा होत असल्यामुळे गावातील नागरिकांना विहीर व नदीतील पाण्याचा वापर करावा लागत आहे. त्यामुळे अनेक आजाराचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे गावातील पाणी पुरवठा तत्काळ सुरळीत करण्याची मागणी करीत संतोष महात्मे यांच्या नेतृत्वात गावकऱ्यांनी मजीप्रावर धडक दिली. येत्या चार दिवसात दखल न घेतल्यास धामोळी येथील पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करण्याचा इशारा निवेदनातून दिला. भातकुली तालुक्यामध्ये ३ झोन असुन झोन न. १ पुर्णानगर मध्ये दोन दिवसाआड पाणी पुरवठा होतो.झोन न. २ भातकुली मध्ये तिन दिवसाआड पाणी पुरवठा होतो. व झोन न. ३ धामोरी मुळ गावात एक दिवसा आड पाणी पुरवठा होतो. वाठोडा शुक्लेश्वर व इतर गावे विसरोळी प्रकल्पामध्ये येत असून पाणी पुरवठा आठ ते दहा दिवसाआड होत आहे. वाठोडा शुक्लेश्वर या गावावर एवढा अन्यायअन्याय का? आम्हाला दोन दिवसाच्या आड पाणी पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी करीत संतोष महात्मे यांच्या नेतृत्वात मजीप्रा अधिकाऱ्यांना निवेदन दिले. येत्यातिनतेचारदिवसामध्ये गावचापाणीपुरवठा सुरळीतनझाल्यास धामोरी येथिल पाण्याच्या टॉकीवर चढून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून दिला. निवेदन देताना संतोष मुरलीधरराव महात्मे यांच्यासह, रविंद्र पांडुरंग बुरघाटे, शाम अरुणराव चाहाकर, दिपक भिमरावराव जवंजाळ, प्रज्वल संजयराव यावले, लिखित रमेशराव चांदुरकर, उमेश रमेशराव घुरडे यांच्यासह अनेक गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंजनगाव तालुक्याला अवकाळीचा फटका

## पावसामुळे शेतकऱ्यांची उडाली तारांबळ



**दि३० विदर्भ प्रजासत्ताक अंजनगाव सुर्जी,** तालुक्यात सोमवारी मध्यरात्रीपासून सुरु झालेल्या अवकाळी पावसाचा कपाशीला फटका बसला आहे तर तुर व हरभर्यासाठी नवसंजवनी ठरणार असल्याचे कृषी विभागातर्फे सांगण्यात आले. तालुक्यात कपाशी वेचणीचा हंगाम सुरु असून मजुर टंचाईमुळे बहुतेक शेतातील कापुस भिजला व लोंबकळुन जमीनदोस्त झाला. ज्या शेतकर्यांचा कापसाचा वेचा झाला नाही, त्याना मात्र या अवकाळीचा फटका बसलेला आहे. तालुक्यातील सहा मंडळात २७ व २८ या दोन दिवसात सरासरी ५०.८ मिमिची नोंद झालेली आहे.

अंजनगाव सुर्जी मंडळात ४६.५, भंडारज ४९.५, सातेगाव ३४.१, कापुस तळणी ५४.५, कोकर्डा ४९.६ तर विहीगांव मंडळात सर्वाधीक ७०.५ मि.मी.पावसाची नोंद झाली आहे. पावसाने काही शेतकरी सुखावले तर काही दुखावले असल्याचे पाहण्यात येत आहे. सदर अवकाळी पाऊस कोरडवाहू कास्तकारांसाठी चांगला ठरला. मात्र, ज्यांनी कपाशी, तुरीला ओलीत केले त्यांना हा अवकाळी पाऊस काळ ठरण्याची चिन्हे आहेत. तुर व कपाशीचा माल ओलीताच्या व झालेल्या पावसाने ओलाझाल्याने गळणार आहे. परंतु, ही दीर्घ मुदतीचे पिके असल्याने नवीन पात्या, फुले येवुन त्यांची भरपाई होईल, असा कृषी खात्या मार्फत कयास वर्तवण्यात आला आहे. रब्बी हंगामातील गहु, कांदा, हरबरा पिकांपैकी ज्या शेतकर्यांनी कोरडवाहु हरबरा पेरणी केली त्यांना हा अवकाळी पाऊस नवसंजवनी ठरणार आहे.

### दुबार पेरणीची शक्यता

ज्या शेतकर्यांनी शेत भिजवून हरबर्याची पेरणी केलेली आहे, जर पावसाने अधीक मुक्काम केल्यास त्या शेतकर्यांवर दुबार पेरणीचे संकट उभे राहणार आहे. या अचानक आलेल्या अवकाळी पावसाने रब्बी हंगामातील हरबरा पिकाचे क्षेत्र वाढ होण्याचा व दुबार हरबरा पेरणीचा अंदाज पाहुन कृषी उत्पन्न बाजार समिती मधील व बाहेरील व्यापार्यांनी खरेदी केलेला हरबर्याची विक्री बिजवाई विक्रीच्या दृष्टीने थांबवलेली असल्याचे पहावयास मिळत आहे.

# व्यसनाधिनते पासून मुक्ती मिळवा संदेश देणारे खेळीमेळी'



**दि३० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** ६२ व्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धे मधे अमरावती केंद्रावरील प्राथमिक फेरीत दि. २९ रोजी चंद्रशेखर फणसळकर लिखित आणि प्रसाद कुलकर्णी दिग्दर्शीत खेळीमेळी नाटक सादर करण्यात आले. अमरावती मधे सुरु झालेल्या थंडीत या नाटकाला रसिकांचा उपस्थिती मात्र भरपूर होती सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि संचालक सांस्कृतिक कार्य बिभीषण चावरे यांचे मार्गदर्शनात स्पर्धेची ही प्राथमिक फेरी संपूर्ण महाराष्ट्रात सुरु असून या मालिकेत आज खेळीमेळी या नाटकाच्या सादरीकरणाने आणखी एक पुष्प ओवल्या गेले.

स्वतःला न ओळखणारा आणि झेप पोचणार नाही असे स्वप्न बघणारा तरुण गोपीनाथ, ज्याच्या घरात सुद्धा व्यसनधिनता आहे हे नाटकातील मुख्य पात्र. आपल्या पंखात किती शक्ती आहे याचा विचार न करता झेप घेताना नशिबात नैराश्य येते आणि मग तो घर सोडून निघून जातो. अवास्तव शैलीतून प्रखरपणे वास्तव मांडण्याचा प्रयत्न या नाटकात केलेला आहे. गोपीनाथच्या पुढच्या प्रवासात त्याला सोबती सुद्धा मिळतात ते व्यसनधीनच आणि मग व्यसनाचे दुष्परिणाम प्रेक्षकांना दिसत असतानाच त्या गोपीनाथ च्या एका व्यसनधीन सोबत्याचा मृत्यू होतो आणि पहिल्या अंकाचा पडदा पडतो.

सूचक नेपथ्य, पात्रानी गाईलेली भजन सदृश गीतं, नेमकं संगीत आणि प्रकाशयोजना या नाट्यकृतीत रसिकांना अनुभवायला मिळाली.

चंद्रशेखर फणसळकर दिग्दर्शीत खेळीमेळी या नाटकाची निर्मिती सरकार बहूउद्देशीय संस्था , अमरावती यांची असून दिग्दर्शन प्रसाद कुलकर्णी यांचे आहे.

तांत्रिक बाजू म्हणजे नेपथ्य प्रणव कोरे ,यांनी तर संगीत- रंगभूषा - वेशभूषा स्नेहशील गणवीर , रंगमंच व्यवस्था - राहुल वासनकर प्रकाश योजना - वैभव देशमुख यांनी सांभाळली. आजच्या या नाट्यकृतीत जवळपास २० कळावंतांनी भूमिका साकारल्यात. गोपी - अभिजित झाडे, दामू - गणेश वानखडे, मुरली - प्रसाद कुलकर्णी, निलकांती - तन्वी लिखितकर, सप्रे - संजय काळे, आई - दीपाली बाभुळकर, बाबा - संजय यवतकर, नलू - वसुंधरा निस्ताने, आपटे - देवाशिष फडणीस, महेश - सौरभ शेंडे, विष्णुभाई - उत्सव देशमुख, पंढरी - सत्यम किरकटे, वामन - भारत वानखडे, राम - आदित्य पाचघरे, गणेश - स्वप्नील घोडेस्वार, आणि सहकलावंत - शुभम सुदा, तनय रोठे, प्रेम पत्रे, सारंग घाडगे, विपीन तातड यांनी भूमिका साकारल्यात. आज गुरवार दि. ३० रोजी समर्पण बहूउद्देशीय संस्था, अमरावती निर्मित, अमोल रेडिज लिखित व किशोर पाचकवडे दिग्दर्शीत जिहाद ' हे नाटक संत ज्ञानेश्वर नाट्य गृहात सायंकाळी ठीक ७.०० वाजता सादर होईल. रसिक प्रेक्षकांनी कृपया नोंद घ्यावी अशी विनंती स्पर्धा समन्वयक ऍड. चंद्रशेखर डोरले आणि सहसमन्वयक श्रद्धा पाटेकर व विशाल फाटे यांनी केले आहे.

# दर्यापुरात पुतळा हटविण्यावरून तणाव

## विरोधानतंर पुतळ्याची पुनर्स्थापना

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर-** तालुक्यातील तत्कालीन सहकार महर्षी म्हणून ओळखले जाणारे माजी मंत्री स्व. एन. यु. उपाख्य अण्णासाहेब देशमुख यांचा शिवर रोडवरील शेतकी जिनिग प्रेसिंगच्या आवारात असलेला पुतळा बुधवारी अचानकपणे काढून दुसरीकडे हलविण्याचा प्रयत्न काही भागधारक व नागरिकांनी विरोध केल्याने अयशस्वी झाला. अखेर संचलक मंडळतील काहींनी मध्यस्थी करीत सदर पुतळा त्याच ठिकाणी बसवून निर्माण झालेला तणाव निवळला.

सहकार महर्षी स्व.आण्णासाहेब देशमुख यांनी तत्कालीन काळात परिसरातील शेतकर्यांच्या भागभांडवलातून बनोसा येथील मध्यवर्ती भागात सहकारी शेतकी जिनिग अॅड प्रेसींग ही संस्था स्थापन केली होती. एकेकाळी संस्थेच्या माध्यमातून तालुक्यातील शेतकर्यांचा कापुस खरेदी करून त्यापासून रूई तयार करण्याचा उपक्रम राबविण्यात येत होता. त्यावेळी संस्था आर्थिक भरभराटी आली होती. अण्णासाहेबाच्या निधनानंतर त्यांनी सहकार क्षेत्रात केलेल्या कार्याची ओळख भविष्यात असावी या उद्देशाने जिनिंज प्रेसींगच्या आवारात त्यांचा पुतळा उभारण्यात आला होता. कालांतराने तत्कालीन संचालक मंडळाने बनोसा (दर्यापुर) भागातील जिनिंगची जागा विकून शिवर रोडवर नवीन शेत घेवून त्याठिकाणी जिनिंगचे स्थानानतंरण केले.

त्यावेळी आण्णासाहेब देशमुख यांचा पुतळा सुद्धा त्याठिकाणी हलविण्यात आला होता. नंतरच्या काळात अकार्यक्षम संचालकामुळे जिनिंग प्रेसींग डबघाईस आल्याने उत्पादन बंद पडले. आण्णासाहेब देशमुख यांच्या पुतळ्याकडे व्यवस्थापणाचे दुर्लक्ष होत गेले. त्याठिकाणा वरून त्यांचा पुतळा सुरक्षित ठिकाणी उभारावा अशी मागणी अनेक दिवसांपासून करण्यात येत होती. मात्र संचालक



व व्यवस्थापकांनी मागणीकडे दुर्लक्ष केले. बुधवारी सायंकाळी अचानक काही कामगार पाठवून चबुतर्या वरून पुतळा छन्नी हातोड्याच्या सहाय्याने काढण्यात आला. याची माहिती संस्थेच्या काही भागधारक व नागरिकांना मिळताच त्यांनी धाव घेवून या प्रकाराला विरोध केला. अखेर संस्थेचे अध्यक्ष व व्यवस्थापकांनी सदर पुतळा न हलवीता त्याच ठिकाणी ठेवण्याचा निर्णय घेतल्याने प्रकरण शांत झाले. काढलेल्या पुतळ्याला सन्मानपुर्वक हारार्पण करून नागरिकांच्या उपस्थितीत त्याच चबुतर्यावर स्थापीत करण्यात आले.



# मराठी पाट्या संदर्भात कायदेशीर कार्यवाही करा...

## मनसेची मनपा आयुक्ताना अल्टीमेटम

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** - सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार गेल्या २५ नोव्हेंबर २०२३ पासून महाराष्ट्रातील सर्व आस्थापना व दुकानावर मराठी पाटी किंवा फलक असणे अनिर्वाय आहे.मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रातील सर्वंच ठिकाणी महाराष्ट्र सैनिक याबाबतीत सक्रिय झाले असून निवेदन आंदोलनच्या माध्यमातून प्रशासनाला धारेवर धरण्याचे काम सुरु आहे.याच अनुषंगाने अमरावती महाराष्ट्र नवनिर्माण सेने सुद्धा आज महानगरपालिकेत धडक देऊन उपायुक्त श्री जुम्मा प्यारेलालजी यांना पत्र देऊन ७ दिवसात मराठी पाट्या वा फलक लावावे अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पद्धतीने आंदोलनाचा इशारा दिला.यावेळी शहर अध्यक्ष धिरज तायडे, बडनेरा शहर अध्यक्ष गौरव बांते, जनहित कक्ष जिल्हासंघटक श्री प्रवीण डांगे, शहर संघटक श्री बबलू आठवले, महिला सेनेच्या उपजिल्हाअध्यक्ष सौ. संगीताताई मडावी, सौ तृप्तीताई पानसरे, सौ. मनीषाताई ओलंबे, मयंक तांबूस्कर, अमोल राऊत, निखिल चौधरी, विक्की लोणकर, महेश सिडाम, संजय हिवरकर आदि महाराष्ट्र सैनिक उपस्थितीत होते.

# करजगावच्या उपसरपंचपदी धनंजय देशमुख

## भाजपा,प्रहारला दणका : फोडाफोडीचे राजकारण यशस्वी

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक करजगाव** चांदूरबाजार तालुक्यातील सर्वांत मोठ्या करजगाव ग्रामपंचायत येथे बुधवार रोजी

उपसरपंचपदाची निवडणूक झाली. त्यात काँग्रेस व युवाक्रांती संघटना युतीचे धनंजय देशमुख विजयी झाले. तर मताधिक्य असतानाही भाजप व प्रहार समीत उमेदवाराला हार पत्करावी लागली.

उपसरपंच सोनू ऊर्फ महेंद्र कांडलकर यांनी नुकताच राजीनामा दिला. त्यानंतर संपूर्ण गावामध्ये निवडणुकीचे वारे वाहू लागले. उपसरपंच म्हणून चर्चेत असणारे भाजपसमर्थात प्रहारचे बाळू धाडसे, तर काँग्रेस व युवाक्रांती संघटना युतीचे धनंजय देशमुख यांच्यात आज करजगाव ग्रामपंचायतमध्ये निवडणूक पार पडली यात प्रहारतर्फे बाळकृष्ण धाडसे, तर काँग्रेस व युवाक्रांती संघटनेतर्फे धनंजय देशमुख यांनी अर्ज दाखल केला होता. ही निवडणूक गुप्त पद्धतीने घेण्यात आली. त्यात बाळकृष्ण धाडसे यांना आठ मते, तर धनंजय देशमुख यांना नऊ मते पडली. त्यामुळे धनंजय देशमुख यांना विजयी घोषित करण्यात आले. निवडणूक अधिकारी म्हणून



पीठासीन अधिकारी कविता नागले व गावाचे तलाठीश्री जोशी उपस्थित होते. करजगाव ग्रामपंचायतमध्ये भाजप व प्रहार मिळून नऊ सदस्य होते, तर काँग्रेस व युवाक्रांती संघटना युतीचे आठ सदस्य होते. यात प्रहारच्या उमेदवाराचा विजय निश्चित मानल्या जात होते. मात्र राजकारण खेळल्या गेल्याने काँग्रेसचे उमेदवार धनंजय देशमुख यांचा विजय झाला, तर प्रहारचे उमेदवार बाळकृष्ण धाडसे यांना पराभवाला सामोरे जावे लागले.

# अवैध सावकारी, साईनगरातील गुरुजीच्या घरी सहकार विभागाची धाड

## अचलपूर सहायक निबंधकांकडील तक्रार

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** अवैध सावकारी संदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने येथील साईनगर परिसरातील मोहननगर येथे राहणाऱ्या एका शिक्षकाच्या घरी येथील पथकाने बुधवारी धाड टाकली. यामध्ये अवैध सावकारीच्या संशयावरून कागदपत्रे जप्त करण्यात आली. सदर व्यक्ती अंजनगाव सुर्जी येथील प्रागतिक विद्यालयात माध्यमिक शिक्षक असल्याचे सहकार विभागाने सांगितले.

जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार रवींद्र भीमराव भागवत (रा. मोहननगर, साई मंदिराजवळ) यांच्याविरुद्ध अवैध सावकारी संदर्भातील तक्रार अचलपूर एआर कार्यालयास प्राप्त झाली. यामध्ये तक्रारकर्ता हे अचलपूर तालुक्यातील रहिवासी आहे. मात्र, भागवत हे अमरावतीला राहत असल्याने तक्रार अमरावती सहायक निबंधकांकडे पाठविण्यात आली. यामध्ये चौकशीत तथ्य आढळल्याने महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ मधील तरतुदीनूसार जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी एक पथक गठित गेले व या पथकाने नांदगाव पेठ ठाण्याच्या हद्दीतील भागवत यांच्या घरी धाड टाकण्यात आली. या धाडीमध्ये खरेदी खत, इसार पावती, कोरे धनादेश, व्याजाच्या कच्च्या नोंदी असलेल्या डायरी जप्त करण्यात आल्याचे डीडीआर कार्यालयाचे सहकार अधिकारी सुधीर मानकर यांनी सांगितले. ही कारवाई पथकप्रमुख व नांदगाव खंडेश्वरचे सहायक निबंधक सचिन पतंगे, सहायक कर्मचारी अविनाश महल्ले, नीलेश सपकाळ, चेतना कुचे यांनी केली.



### अचलपूर एआर करणार कागदपत्रांची पडताळणी

अचलपूर कार्यालयात तक्रार झालेली असल्याने जप्तीमधील सीलबंद कागदपत्रे हे अचलपूर एआर परेश गुल्हाने यांच्याकडे पाठविण्यात आलेली आहे. त्यांच्याद्वारा या कागदपत्रांची पडताळणी व शहानिशा करण्यात येईल. यामध्ये अवैध सावकारी सिद्ध झाल्यास कारवाई होणार आहे. दरम्यान, या प्रकरणाची सुनावणीदेखील अचलपूर येथे होणार असल्याचे मानकर यांनी सांगितले.

# जिजाऊ बँकेच्या संचालक मंडळासाठी ३१ डिसेंबरला मतदान

## ६६७७ मतदार निवडणार पंधरा संचालक

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** सहकारी बँकिंग क्षेत्रातील प्रतिष्ठित असलेल्या जिजाऊ कमर्शियल को-ऑप संचालक बँकेच्या मंडळाची येत्या निवडणूक ३१ डिसेंबरला होत आहे. मतदानानंतर लगेच दुसऱ्या दिवशी एक जानेवारीस मतमोजणी करण्यात येणार आहे. नवीन वर्षात नवे संचालक मंडळ आरूढ होणार आहे. सहकार विभागाने जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार २८ नोव्हेंबरपासून चार डिसेंबरपर्यंत नामांकन दाखल करता येणार आहे. पाच डिसेंबरला या अजांची छाननी करण्यात येऊन पात्र उमेदवारांचीयादी जाहीर करण्यात येणार आहे. ६ ते २० डिसेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार असून २१ डिसेंबरला निवडणूक रिंगणातील उमेदवारांची अंतिम यादी जाहीर केल्या जाणार आहे. ३१ डिसेंबरला सकाळी आठ ते दुपारी चारपर्यंत मतदान घेण्यात येणार

असून दुसऱ्या दिवशी एक जानेवारीस मतमोजणी करण्यात येणार आहे.

जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँकेच्या संचालक मंडळात पंधरा सदस्य असून त्यामध्ये १० संचालक सर्वसाधारण प्रवर्गातील आहेत. दोन संचालक महिला गटातून तर ओबीसी, व्हीजेएनटी व एससी-एसटी मतदारसंघातून प्रत्येकी एक संचालक निवडून येणार आहे. बँकेच्या एकूण अकरा शाखा असून ६६७७ मतदारसंख्या आहे.




# पोर्णिमा पंकज आकोडे हिने शालेय राज्यस्तरीय जिम्नॅस्टीक स्पर्धेत पटकाविले कास्य पदक



**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती, अमरावती** - श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती जिल्हा हौशी जिम्नॅस्टीक प्रशिक्षण केंद्राचे खेळाडू शालेय राज्यस्तरीय जिम्नॅस्टीक स्पर्धेकरीता अमरावती विभागाच्या संघात निवड झाली असून क्रीडा व युवक संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी पुणे द्वारे शिव छत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी पुणे येथे दिनांक २६ ते २९ नोव्हेंबर २०२३ दरम्यान आयोजीत शालेय राज्यस्तरीय जिम्नॅस्टीक स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. या शालेय राज्यस्तरीय जिम्नॅस्टीक स्पर्धेत मनपा कर्मचारी श्री पंकज आकोडे यांची मुलगी कु.पोर्णिमा आकोडे हिने अॅक्रोबॅटीक्स जिम्नॅस्टीक मधील मुलीच्या १९ वर्ष वयोगटातील वुमेन्स ग्रुप मध्ये कास्य पदक पटकावून या खेळात अमरावती जिल्ह्याचे नाव रोशन केले आहे. तिच्या या नावलौकीक यशाबद्दल श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांच्यासह प्रशिक्षक व व्यवस्थापक म्हणून जिम्नास्टीक विभाग प्रमुख प्रा.आशिष हटेकर एन आय एस प्रशिक्षक सचिन कोठारे, अक्षय अवघाते, हेमा राज वैद्य तसेच होलिक्रॉस इंग्रजी हायस्कुल च्या मुख्याध्यापिका, क्रीडा शिक्षक यांनी भरभरुन कौतुक करत शुभेच्छा दिल्या.

# रब्बी हंगाम पिकस्पर्धेत सहभागी होण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज आमंत्रित

## शेतकऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** अमरावती जिल्ह्यात पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन विजेत्या शेतकऱ्यांचा गौरव व्हावा, यासाठी पिक स्पर्धा योजना राबविण्यात येते. रब्बी हंगाम पिक स्पर्धा २०२३ मध्ये शेतकऱ्यांनी सहभागी होण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज दाखल करावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.पीकस्पर्धेमध्ये रब्बी पीके ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस अशा एकूण पाच पीकांचा समावेश करण्यात आला आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वत:च्या नावावर जमीन असणे व ती जमीन स्वत: कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल. पिकस्पर्धेमध्ये सहभागी लाभार्थीच्या स्वत:च्या शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर (१एकर) क्षेत्रावर सलग लागवड करणे आवश्यक आहे.कलर

**अर्जासाठी आवश्यक**




**कागदपत्रे :** विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ), ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, सात-बारा, आठ-अ चा उतारा, आदिवासी असल्याचा जात प्रमाणपत्र, पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा. बँक खाते धनादेश किंवा पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.पिक स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी शेतकरी बांधवानी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा तसेच अधिक माहिती साठी कृषी विभागाचे संकेतस्थळ www. krishi. m aharash tra. gov.in ला भेट द्यावी. दुय्यम तसेच पौष्टीक तृधधान्य पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादनात वाढ व्हावी याकरीता जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पिकस्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क :

* पीकनिहाय सर्वसाधारण गटासाठी रक्कम ३०० रुपये तर आदिवासी गटासाठी रक्कम १५० रूपये राहील.

### बक्षिस वितरण :

सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी बक्षीस याप्रमाणे- तालुका पातळीवरील पहिले बक्षिस ५ हजार रुपये, दुसरे बक्षिस ३ हजार व तिसरे बक्षिस २ हजार रुपये. जिल्हा पातळीवरील पहिले बक्षिस १० हजार, दुसरे बक्षिस ७ हजार व तिसरे बक्षिस ५ हजार. तर राज्य पातळीवरील पहिले बक्षिस ५० हजार, दुसरे बक्षिस ४० हजार व तिसरे बक्षिस ३० हजार रुपये.

# पुढील आठवड्यापासून पोषण आहारात अंडी, पुलाव

## खरेदीचे अधिकार असतील शालेय समितीला

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

शालेय पोषण आहारात विद्यार्थ्यांना पुढील आठवड्यापासून अंडी, पुलाव मिळणार आहे. अंडी न खाणाऱ्यांसाठी केळी, चिकू किंवा इतर दुसरे फळ दिले जाणार आहे. आठवड्यातील बुधवार किंवा शुक्रवार यापैकी कोणत्याही एका दिवशी प्रतिविद्यार्थी पाच रुपयांप्रमाणे हा खर्च होईल. दर आठवड्याला लाखो रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. खरेदीचे अधिकार शालेय समितीला आहेत. प्राथमिक शिक्षण विभागाने यासंदर्भात सूचना केल्या आहेत. जिल्ह्यातील जिल्हा परिषदेसह इतर खासगी अनुदानित शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहाराचा लाभ मिळणार आहे.



**एमडीएम पोर्टलवर नोंद बंधनकारक**

पहिल्या टप्प्यात आवश्यक असलेला सहा आठवड्यांचा निधी ग्रामीण भागातील शाळांना अग्रिम स्वरुपाचा देण्यात येणार आहे. त्यानंतर शाळांनी केलेला खर्च, उपक्रमाची अंमलबजावणी तसेच केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त निधी विचारात घेऊन पुढील निधी शाळांना उपलब्ध होईल. शाळांना नियमित आहाराची उपस्थितीची नोंद एमडीएम पोर्टलवर ऑनलाइन नोंदवणे बंधनकारक असेल. केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीतर्गत असणाऱ्या शाळांनीदेखील दैनंदिनी उपस्थितीची माहिती एमडीएम पोर्टलवर अपलोड करावयाची आहे. जर अंडी, केळीचा लाभ दिल्यानंतर माहिती अपलोड न केल्यास अनुदान मिळणार नसल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. मुलांना खरंच लाभ मिळतो आहे की नाही, याची खातरजमा करण्यासाठी क्षेत्रीय अधिकारी शाळांना भेटी देतील.

# अखेर राजेंद्र प्रसाद यांचे निलंबन; विभागीय चौकशी विद्यापीठ कुलसचिवांकडून आदेश जारी

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे रसायनशास्त्रबाहो बाबा अमरावती विद्यापीठ विभागप्रमुख डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्यावर मंगळवारी निलंबनाची कारवाई करण्यात आली असून, विभागीय चौकशीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. यापूर्वी त्यांना प्रभारी कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांच्या निर्देशानुसार पदमुक्त करण्यात आले होते, हे विशेष

डॉ. राजेंद्र प्रसाद हे रसायनशास्त्र विभागप्रमुख आहेत. मात्र, याच विभागाच्या सहायक प्राध्यापिका डॉ. जे. एम. बारद्धे, सहयोगी प्राध्यापिका डॉ. मनीषा कोडापे यांनी २ जानेवारी २०१३ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या कारनाम्याबाबत तक्रार दाखल केली होती, त्याआधारे विद्यापीठ प्रशासनाने चौकशी समिती गठीत केली होती. त्यानंतर प्रभारी कुलगुरू डॉ. येवले यांनी डी. प्रसाद यांनी खुलासादेखील सादर केला होता. दरम्यान, डॉ. प्रसाद यांच्याविरुद्ध चौकशी समितीने सादर केलेला अहवाल कुलगुरूंनी मान्य केला होता. मात्र, चौकशी समितीने महिला प्राध्यापकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने काही बाबी गंभीरपणे नोंदविल्या आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान आणि विभागाची होणारी बदनामी लक्षात घेता डॉ. राजेंद्र प्रसाद यांना अगोदर पदमुक्त करण्यात आले. सिनेट सभागृहात याविषयी चर्चादेखील झाली. आता कुलगुरूंनी चौकशी समितीच्याअहवालाचा आधार घेत निलंबनाची

कारवाई झाल्याची माहिती कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यानी दिली.डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या विभागीय चौकाशी अहवालानंतर पुढील कारवाईची दिशा निजित केली जाईल, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून मिळाली आहे




### अशी होती चार सदस्यीय समिती

डॉ. जे. एम. बारळे आणि डॉ. मनीषा कोडापे या दोन महिलाप्राध्यापकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने विद्यापीठ प्रशासनाने डॉ.राजेंद प्रसाद यांच्याबाबत चार सदस्यीय चौकशी समिती गठीत केली होती. यात अध्यक्षपदी डॉ. आर. एम. कडू तर सदस्य म्हणून डॉ. प्रवीण रघुवंशी, डॉ. मोना विमोटे आणि सचिवपटी मंगेश वरखडे हे होते, या समितीने सादर केलेल्या अहवालाचा आधार घेत प्रभारी कुलगुरु डॉ. येवले यांनी डॉ. राजेंद प्रसाद यांच्यावर निलंबनाच्या कारवाईचा निर्णय घेतल्याची माहिती आहे.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात संविधान दिवस साजरा व २६/११ मध्ये शहीद झालेल्या वीर जवानांना श्रद्धांजली अर्पण

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयात संविधान दिवस साजरा करण्यात आला, संपूर्ण जगभरातील सर्वात मोठी लोकशाही असलेला भारत देश हा जगातील सर्वात मोठे लिखित संविधान असलेल्या भारतीय संविधानावर चालतो. भारतीय संविधान हा लोकशाहीचा मजबूत पाया असून त्यामुळेच देशातील प्रत्येक नागरिकांचे हक्क आणि अधिकार सुरक्षित आहेत. त्यामुळे सर्वांनी संविधानाचा आदर करत अंगिकारने गरजेचे आहे यावेळी संविधान दिननिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हारअर्पण करण्यात आले तसेच संविधान प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले. तसेच संविधानाचे महत्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.त्याचप्रमाणे २००८ मध्ये मुंबई येथील २६/११ च्या भ्याड हल्ल्यात शहीद झालेले पोलीस कर्मचारी व नागरिक यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.यावेळी पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाचे संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, एन एस एस अधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते



# १० सरपंच, ६ उपसरपंचांची बिनविरोध निवड

## रिक्त पदांच्या निवडीसाठी पार पडली विशेष सभा : पाच पदांसाठी झाली निवडणूक

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :**

राजीनामा, मृत, अपात्र यासह अन्य कारणांमुळे रिक्त असलेल्या पदांसाठी २१ ग्रामपंचायतींमध्ये बुधवारी विशेष सभा घेण्यात आली. यामध्ये १० सरपंच व ६ उपसरपंच बिनविरोध निवडले गेले. याशिवाय दोन सरपंच व तीन उपसरपंचपदांसाठी निवडणूक झालेली आहे.

गावच्या राजकारणातील तडजोडीनुसार सरपंच व उपसरपंचपद हे अडीच वर्षांसाठी विभागले जात आहे. त्यामुळे कार्यकाळ पूर्ण होताच पदाधिकारी राजीनामा देत असल्याने पदे रिक्त होत आहेत. या रिक्त पदांसाठी जिल्हा निवडणूक विभागाद्वारा कार्यक्रम लावण्यात आला व बुधवारी निवडणूक घेण्यात आलेली आहे. यामध्ये सरपंचपदासाठी डवरगाव

इंदिरा प्रमोद आठवले, हातखेडा मंजू भीमराव ओगले, सायत अन्नपूर्णा ज्ञानेश्वर मानकर, शेंदूरजना बाजारला आशा किशोर चौधरी, दापोरी खुर्द येथे सपना अतुल डोळस, भिवापूरला मनोज मदन चव्हाण, वाठोडा खुर्द येथे दुर्गा योगेश लोंदे, शेंदूरजना खुर्द येथे शीतल संतोष सोमोसे, निंबोली येथे कुसुम पुंडलिकराव येडमे, नांदेड बुजरुक येथे – प्रणिता रवींद्र पवार, इत्तमगावला प्रवीण अशोकराव मानकर व कणी मिर्झापूर येथे रिना मारोती कांबळे सरपंच म्हणून निवडून आल्या आहेत.

**हे झालेत उपसरपंच**

उपसरपंच पदासाठी धामोरी (क) अनिल टेकाडे, धामंत्री नारायण सुरजूसे, सातरगाव संगीता संजय बरडे, गव्हा फरकाडे अवधूत उत्तम खडसे, बोरगाव निस्ताने शिला सुनील चौखट, कान्होली पद्माकर साहेबराव राऊत, मांगरुळी विलास हरिभाऊ बांबल, बोपापूर सुभाष श्रीराम इंगोले व करजगाव येथे धनंजय कृष्णराव देशमुख निवडून आले आहेत.

# अंजनगाव बारी येथील शाळेचा प्रश्न लागणार निकाली

## नितीन कदम यांनी घटनास्थळी भेट

**दि३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती २५**

बडनेरा ग्रामीण भागातील अंजनगाव बारी परिसरात चावडी चौक येथील जिल्हा परीषद मुलींची कन्या शाळा बंद करून नवीन जागेवरती बांधण्याच्या प्रस्तावाविरोधात जनारोष बघायला मिळाला. येथिल ग्रामीण परिसरात मुलींचा सुरक्षिततेचा प्रश्न,दळणवळणाची होणारी गैरसोय, रस्त्यांची दुर्दैवी अवस्था, व वाढत चाललेली गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकाचा सामना मुलींना करावा लागत असल्या कारणाने येथील पालकवर्ग जुन्या जागेवरच शाळा बांधून देण्याच्या मागणीवर ठाम राहिले. परिस्थीती चिघळन्याचा मार्गावर असताना नितीन कदम यांनी तात्काळ पालकवर्गाच्या आंदोलन स्थळी भेट देत शेकडोच्या समूहाला शांत केला.



तणावपूर्ण वातावरण असताना नितीन कदम यांनी पालकांना शाळेसंदर्भातील अन्यायकारक प्रस्तावाला आपला विरोध प्रकट करतं सोमवारी झालेल्या पालक सभेमध्ये शाळा व्यवस्थापन समितीला जाब विचारत चांगलीच कानउघाडणी केली. त्यावर व्यवस्थापनाच्या ११ पैकी ८ सदस्यांनी नितीन कदम व पालकाच्या मागणीला आपली सहमती दर्शविली. स्थानिक ग्राम पंचायत प्रशासनाला याविषयी विचारले असता शाळा व्यवस्थापन समितीच्या काहीं सदस्यांनी नवीन शाळा उभारणीच्या ठराव घेऊन तो प्रस्ताव ग्राम पंचायतला सादर केला असता मागणीनुसार स्थानिक प्रशासनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आला होता. याविषयी अधिकारी वर्गाकडून उडवाउडवीची उत्तरे बघायला मिळत होती. म्हणुन नितीन कदम यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारत चांगलेच खडसावले. शाळेच्या प्रस्तावित जागेसंदर्भात गावामध्ये तणावाचे वातावरण बघायला मिळत होते. संपूर्ण वास्तविकता लक्षात घेऊन नितीन कदम यांनी जमाव शांत करतं लवकरच याबाबतचा पाठपुरावा करून शाळेचा प्रश्नक निकाली लावणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. यासंबधी अधिकाऱ्यांना निवेदन देणेकरिता संपूर्ण पालकवर्ग व संकल्प बहुद्देशीय संस्थेचे सदस्य व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोरोना काळात गरजवंतांना किराणा वाटप प्रकरण

## आ. रवि राणांसह १५ कार्यकर्ते निर्दोष मुक्त : अॅड. दीप मिश्रा यांचा सफल युक्तिवाद

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

कोरोनाच्या काळामध्ये नागरिकांना घरामधून निघण्यासाठी बंदी होती त्यावेळेस लोकांना आवश्यक असलेल्यावस्तू, किराणा, धान्य, खाण्यापिण्याची सोय लागत नव्हती त्यावेळी अनेक गरजवंतांना उपासमारीला बळी पडावे लागले होते. त्यावेळी बडनेरा मतदार संघाचे आमदार रवी राणा यांनी अमरावती जिल्ह्यातील ऑटोवाले, मजूर, कामगार, हमाल बांधव, अंध अपंग, यांच्यासह लाखो गरजवंतांना किराणा किटचे वाटप घरोघरी जाऊन केले होते. या प्रकरणी दाखल गुन्ह्यातून आ. रविराणांसह १५ कार्यकर्त्यांचीनिर्दोष मुक्तता करण्यात आली.

कोरोनाच्या कार्यकाळामध्ये तत्कालीन पोलीस आयुक्त आरती सिग यांनी किराणा वाटप करू नका जर तुम्ही वाटप केल्यास व तुम्ही जर घराबाहेरून निघाल्यास तुमच्यावर गुन्हे दाखल करू अशा प्रकारची धमकी आमदार रवी राणा यांच्यासह कार्यकर्त्यांना दिली होती. आमदार रवी राणा यांच्यासह त्यांच्या कार्यकर्त्यांनी त्या धमकिला ना घाबरता या महामारीच्या काळामध्ये गरजवंत, बेघर अनेकांना लाखो किराणा किटचे वाटप २० मे २०२० मध्ये करण्यात आले होते .त्यावेळी तत्कालीन पोलीस आयुक्त आरती सिंग



यांनी खोटे गुन्हे दाखल करून आमदार रवी राणायांच्यासह जवळपास १५ कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले होते. त्यावर कार्यकर्त्यांवर अनेक केसेस लावल्या त्यामधील केस न ३१०५/२० कलम १८८, २६९, सू ५१ इ डिझास्टर मॅनेजमेंट अॅक्ट मुंबई कायदा १३५, साथी रोग कायदा ३,४, या केस संबंधित ३ रे अतिरिक्त मुख्य न्यायाधीश सागर पाटील यांच्या कोर्टामध्ये चालू होती. त्या केस बाबत आमदार रवी राणा यांचे विधी सल्लागार एडवोकेट दीप मिश्रा यांनी सफल युक्तिवाद करून आमदार रवी राणा यांच्यासह १५ कार्यकर्त्यांना निर्दोष मुक्तता केली. त्यामध्ये, आमदार रवी राणा, संजय हिगासपुरे, जितू दुधाने, नितीन बोरेकर विनोद गुहे अनुप अग्रवाल अनिल मिश्रा राहुल बजाज नितीन म्हस्के अवि काळे अजय मोरया पंकज बोबडे सचिन भेंडे शैलेंद्र कस्तुरे अभिजीत देशमुख त्यांच्यासह १५ कार्यकर्त्यांना ३ रे अतिरिक्त मुख्य न्यायाधीश सागर पाटील यांनी निर्दोष सोडले .आमदार रवी राणा तसेच कार्यकर्त्यांच्या वतीने या केसेसमध्ये डव्होकेट दीप मिश्रा यांनी सफल युक्तिवाद केला तर एडवोकेट चंदु गुळसुंदरे यांनी उत्कृष्ट कामकाज पाहिले.

# अवकाळी पावसाने घेतली विश्रांती

## तीन दिवसात ४८मिमी बरसला रब्बीच्या पेरणीस आली गती

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

गेल्या तीन दिवसांपासून हजेरी लावणार्या अवकाळी पावसाने आज चौथ्या दिवशी विश्रांती घेतली. सकाळपासून वातावरण ढगाळ असले तरी पावसाच्या सरी कोसळल्या नाहीत. गेल्या दोन दिवसांत अमरावती जिल्ह्यात ४८.६ मिमी पावसाची नोंद झाली असून सामान्य पावसाच्या तुलनेत तो २६६ टक्के आहे. रविवारी (ता. २६) उशिरा रात्रीपासून अवकाळी पावसाने जिल्ह्यात सर्वत्र हजेरी लावली. पहिल्या दिवशी १३.८ मिमो तर दुसर्या दिवशी त्याचे प्रमाण वाढून २८१. मिमी झाला. काल तिसर्या दिवशी ६.६ मिमी पाऊस झाला असून आतापर्यंत एकूण ४८.५ मिमी पाऊस झाला आहे. अवकाळी पाऊस जिल्ह्यातील रब्बी हंगामास पोषक ठरणार असून पेरण्यांना वेग येणार आहे. आतापर्यंत ४२ टक्के पेरण्या झाल्या असून त्यामध्ये हरभर्याचे क्षेत्र अधिक आहे. खरिपातील तूर शेगा भरण्याच्या अवस्थेत असून या पावसामुळे त्या आणखी परिपक्व होण्यास मदत होणार आहे. तर कापसाचे दोन वेचे आटोपले आहेत. पावसाने कापूस ओला झाला असला तरी नुकसानीचे प्रमाण फार कमी राहणार आहे, असे कृषितज्ज्ञांनी म्हटले आहे.बुधवारी (ता. २९) पावसाने विश्रांती घेतली असून दिवसभर वातावरण मात्र ढगाळ होते.



# गेल इंडिया लि. यांच्या सी.एस.आर. निधी अंतर्गत अमरावती मध्ये मोफत दिव्यांग कॅम्प दि. ९ व १० डिसेंबर

**दि३० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भारत विकास परिषद विकलाग केंद्र, पुणे याच्या रोप्य महोत्सवी वर्षात जागतिक अपंग दिनानिमित श्री. जलाराम सत्संग मंडळ (भक्तीधाम) व श्री. गुजराथी समाज अमरावती यांच्या सहयोगाने गेल इंडिया लि. या कंपनीच्या सौ.एस आर निधी अतर्गत ३५० दिव्यांगाना अत्याधुनिक कृत्रिम मॉड्यूलर पाय आणि हात व पोलिओ कॅलिपर मोफत बसविण्यात येणार आहेत.

ज्या अत्याधुनिक कृत्रिम मॉड्यूलर पायाची कमर्शियल किमत बाहेर रु.५० हजारांपेक्षा जास्त आहे असा पाय दिव्यांगांना मोफत देण्यात येणार आहे. अमरावती व जवळपासच्या सर्व जिल्हयातील दिव्यांगांना विनंती आहे की त्यांनी शिबिरासाठी पूर्व नोंदणी करणे आवश्यक असल्याने नोंदणीसाठी अनिरुद्ध पाटणकर ९५४५५०४९६४ राजेंद्र पाध्ये ९५५२६१८९०० यांना त्वरीत फोन करावा, पूर्व नोंदणी शिवाय शिबिरात प्रवेश नाही अमरावती येथील भक्तीधाम (बडनेरा रोड) येथे दि. ९ व १० डिसेंबर २०२३ रोजी सर्व दिव्यागाची कृत्रिम अवयवासाठी मापे घेण्यात येणार आहेत दिव्यांग व सोबती याचेसाठी मोफत भोजन, चहा इ. सोय आहे.



भारत विकास परिषद ही एक राष्ट्रव्यापी स्वयंसेवी संस्था असून भारतीय नागरिकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झटणारी व त्यांच्यात राष्ट्रभाव, राष्ट्रीय एकात्मता जागृत करणारी सेवा व संस्कार क्षेत्रात निस्वार्थपणे काम करणारी संस्था आहे. विकलांग केंद्रात कोणतीही सरकारी मदत नाही. वैयक्तिक डोनेशन व कंपनी सी.एस. आर. आणि सेवाभावी विविध एन.जी.ओ. याच्या सहकार्याने गेली २५ वर्षे दिव्यांगांची सेवा करण्यात येत आहे.

अमरावती येथील भव्य दिव्यांग कॅम्पच्या आयोजनात अमरावती अधील मा. श्री. रविभाऊ कोल्हे, संचालक गेल इंडिया लि. आणि श्री. जलाराम सत्संग मंडळ (अक्तीधाम) व गुजराथी समाज अमरावती या सर्वांचा तन मन धन पूर्वक सहभाग आहे. तसेच भारत विकास परिषद अमरावती शाखा, सक्षम संस्था अमरावती, स्वावलंबी भारत अभियान, सहकार भारती है संस्थांच्या कार्यकर्त्यांचा प्रचार व व्यवस्था इ मधील सहभागही मोलाचा आहे.


# 'चला माझ्या ताडोबाला', ४० हजार विद्यार्थ्यांनी केली ताडोबा सफारी

## यंदा ५ हजार विद्यार्थ्यांची ताडोबा भ्रमंती : बालवयातच विद्यार्थ्यांना कळावे जंगलाचे महत्त्व

**दि३० विदर्भ प्रजासत्ताक चंद्रपूर**

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामार्फत बफर क्षेत्रातील शाळांकरिता 'चला माझ्या ताडोबाला' निसर्ग शिक्षण उपक्रमांतर्गत तब्बल ४० हजार विद्यार्थ्यांनी ताडोबाची भ्रमंती केली आहे. वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या सूचनेनुसार २०२३-२४ मध्ये १२१ शाळांमधील ५ हजार विद्यार्थ्यांना ही भ्रमंती घडविण्याचा उद्देश आहे.

विद्यार्थ्यांना ताडोबा वनभ्रमंतीसोबतच निसर्ग शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात येईल. वने व व्याघ्र संवर्धनाची चळवळ अधिक प्रबळ या माध्यमातून करण्यात येईल, अशी माहिती ताडोबा-अंधारी व्याघ प्रकल्पाचे (भावसे)




वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी दिली.

बुधवारी या उपक्रमाची सुरुवात मूल वनपरिक्षेत्रातील भगवानपूर, फुलझरी, करवण, काटवन व डोणी येथील शाळेपासून करण्यात आली भगवानपुर है २००७ मध्ये ताडोबा- अंधारी प्रकल्पामधून स्वयंइच्छेने पुनर्वसित झालेले गावआहे. हे गाव कोळसा व बोटेझरी या दोन गावाचे एकत्रित करून या गावाचे नाव भगवानपूर ठेवण्यात आले आहे. या वर्षी प्रथम प्राधान्य या गावाला दिले आहे.

### वनमंत्र्यांची उपक्रमामागील अशीही दूरदृष्टी

जैवविविधतेने संपन्न या व्याघ्र भूमीचे संरक्षण व संवर्धन लोक सहभागाशिवाय शक्य नाही. म्हणून स्थानिकांना या माध्यमातून या वनाचे महत्त्व कळावे आणि विद्यार्थ्यांनी पुढील आयुष्यात एक जबाबदार नागरिक म्हणून वन संवर्धन व संरक्षणासाठी योगदान द्यावे, या हेतूने वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून हा जनजागृतीचा महत्त्वपूर्ण उपक्रम २०१५-१६ पासून ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामार्फत बफर क्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांसाठी चला माझ्या ताडोबाला' या नावाने सुरू करण्यात आला आहे.

### नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले?

या वनाच्या गाभा क्षेत्राचे काटेकोरपणे संरक्षण व संवर्धन व्हावे या हेतूने सन २०१०-११ मध्ये बफर क्षेत्र घोषित करण्यात आले. या बफर क्षेत्रात ९० पेक्षा अधिक गावे असून, या ठिकाणच्या वन क्षेत्रात सुद्धा वाघांचा मोठ्या प्रमाणात वावर आहे. म्हणून ही गावे व्याघ्र प्रकल्पाच्या विकासात्मक उपक्रमांमध्ये जोडण्यात आली. साधारणतः १ लाख लोकसंख्या असलेल्या या क्षेत्रात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन योजनेंतर्गत विविध सर्व स्तरावर विकासात्मक कामे करण्यात येऊ लागली आणि स्थानिक विद्यार्थ्यांना निसर्ग शिक्षणासंदर्भात जनजागृती व्हावी याकरिता हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबवायला सुरुवात झाली.

# राज्यात मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान

## शाळांचे मूल्यांकन करणार : पहिल्या टप्प्यात ४७८ शाळा

**दि३० विदर्भ प्रजासत्ताक**

शाळांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा तसेच आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरण मिळावे म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हे अभियान राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. पहिल्या टप्प्यात ४७८ शाळांचा समावेश करण्यात आला आहे.



राज्यातल्या सर्व व्यवस्थापनांच्या तसेच सर्व माध्यमांच्या शाळा या अभियानात सहभागी असतील. बृहन्मुंबई महानगरपालिका, वर्ग-अ आणि वर्ग-ब महानगरपालिका शाळा, उर्वरित महाराष्ट्र अशा ३ स्तरांवर हे अभियान राबविण्यात येणार आहे. ४५ दिवसांमध्ये हे अभियान राबवायचे आहे. या अभियानातील शाळांसाठी विद्यार्थी केंद्रीत उपक्रम, शाळा व्यवस्थापनाकडून आयोजित उपक्रम यासाठी मिळून १०० गुण असतील.

शाळांच्या मूल्यांकनासाठी महानगरपालिकांच्यास्तरावर विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या अध्यक्षतेखालील तर उर्वरित महाराष्ट्रासाठी केंद्र प्रमुखाच्या अध्यक्षतेखाली मूल्यांकन समिती असेल. याशिवाय तालुका, जिल्हास्तरांवर देखील गटविकास अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समित्या राहतील. प्रत्येक विभागातून सर्वोत्तम कामगिरी बजावलेल्या शाळांची पहिल्या ३ क्रमांकासाठी निवड करण्यात येईल. याकरिता शिक्षण आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समिती राहील.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील तसेच 'अ' व 'ब' वर्ग पालिका क्षेत्रातील शाळांना पहिले पारितोषिक २१ लाख रुपये, दुसरे पारितोषिक ११ लाख रुपये, तिसरे पारितोषिक ७ लाख मिळेल. तर उर्वरित महाराष्ट्रामधील शाळांना देखील तालुका, जिल्हा तसेच विभागनिहाय पारितोषिके मिळतील. राज्यस्तरावर तसेच सर्व व्यवस्थापनांच्या शाळासाठी पहिले पारितोषिक ५१ लाख रुपयांचे असून दुसरे पारितोषिक २१ लाख रुपये आणि तिसरे ११ लाख रुपयांचे असेल. या अभियानासाठी २० कोटी ६३ लाख रुपये खर्चास देखील मान्यता देण्यात आली.

# जागतिक एड्स दिन घोषवाक्य 'आता नेतृत्व व आघाडी समुदायाची'

## दिनांक १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती जिल्ह्यामध्ये वैध्यकीय खाजगी महाविद्यालयात, जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, जिल्हा क्षय रुग्णालय, संदर्भ सेवा रुग्णालय सोबतच ५ उपजिल्हा रुग्णालय, ९ ग्रामीण रुग्णालय, ६० प्राथमिक आरोग्य केंद्र, ७० खाजगी रुग्णालय (नाममात्र शुल्क आकारून ), २ लैगिक आजार समुपदेशन व उपचार केंद्र, शासकीय रक्तपेढी, ४ खाजगी रक्तपेढी तसेच सरकार मान्य एच आई व्ही साठी कार्यरत सामाजिक संस्था मध्ये एच आई व्ही ची तपासणी मोफत सुविधा दिल्या जातात. एच आई व्ही संक्रमण झालेल्या रुग्णांना त्यांच्या पुढील मोफत उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय व डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैध्यकीय महाविद्यालय येथे ए आर टी केंद्र असून उपजिल्हा रुग्णालय सर्व तसेच ग्रामीण रुग्णालय धामणगांव रेल्वे, वरुड, नांदगाव खंडेश्वर, येथे लिंक ए आर टी सेंटर च्या माध्यमातून औषधपचार दिला जातो तसेच मार्गदर्शना करिता प्रशिक्षित



मनुष्यबळ उपलब्ध आहे

जिल्ह्यात एच आई व्ही तपासणी मोठ्या प्रमाणात केल्या जातं असून आर्थिक वर्ष एप्रिल २०२३ ते ऑक्टोबर २०२३ अखेर जिल्ह्यात सर्वासामान्य १०१९२० व्यक्तीची तपासणी करण्यात आली असून या मध्ये १८५ व्यक्तींना एच आई व्ही संक्रमण झाल्याचे आढळून आले असून या पैकी १८१ व्यक्तींना ए आर टी उपचार सुरु करण्यात आले आहे सोबतच त्यांची सी डी ४ तपासणी व्हारलं लोड व इतर आवश्यक तपासन्या करण्यात आल्या. जिल्ह्यात या आर्थिक वर्ष्यात आतापर्यंत ४६३८१ गरोदर मातांची तपासणी करण्यात आली असून त्या मध्ये ९ गर्भावती माता हया संक्रमित आढळल्या असून त्यांच्या सर्व प्रकारच्या आवश्यक तपासन्या करून त्यांना नियमित उपचारा सोबतच मार्गदर्शन करण्यात येत आहे.दिनांक १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन एड्स महिना म्हणून साजरे करण्यात येतात या वर्षीचे घोषवाक्य आता नेतृत्व व आघाडी समुदयाची असून महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई, यांनी दिलेल्या सूचना प्रमाणे संपूर्ण जिल्ह्यात विविध जनजागृती पर तसेच तपासणी कार्यक्रमाचे आयोजन मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समिती अमरावती, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्ह्यातील विविध महाविद्यालय, विविध संस्था यांच्या माध्यमातून राबविले जाणार असल्याची माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय एकनाथराव साखरे जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष यांनी दिली.

# उज्जैन स्थित प्रभू श्री महाकालच्या दरबारातून राणा दाम्पत्य

## लाखो भाविकांच्या उपस्थितीत भव्य कलश यात्रेच्या माध्यमातून अमरावती कडे रवाना होणार

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

आमदार रवी राणा खासदार सौ नवनीत रवी राणा व हनुमान चालीसा चॅरिटेबल ट्रस्ट च्या वतीने अमरावती येथील छत्री तलाव रोडवर हनुमान गढी येथे उभारण्यात येणाऱ्या प्रभू श्री हनुमानजीच्या १११ फूट उंच मूर्तीचा पायाभरणी समारंभात विविध मान्यवर संत महंत आणि आंतरराष्ट्रीय शिवमहापुराण कथा वाचक श्री प्रदीपजी मिश्रा यांच्या हस्ते या सर्व कलशातील पवित्र माती विधिवत पूजन करून अर्पित केली जाणार आहे.

आमदार रवी राणा यांनी अयोध्या येथे स्वतः जावून पावन प्रभू श्री राम जन्मभूमी अयोध्या व पवित्र हनुमान गढी अयोध्या येथील माती संकलित केली होती,महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व हनुमान गढी चे महंत श्री राजुदास महाराज यांनी हे पवित्र कलश आमदार रवी राणा यांच्या सुपूर्द केले होते,तिथून भक्ती शक्ती रथाच्या द्वारा हे कलश श्री



क्षेत्र उज्जैन येथील प्रभू श्री महाकाल मंदिरात ठेवण्यात आले होते.शनिवार दिनांक २ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ठीक ७ वाजता आमदार रवी राणा,खासदार सौ नवनीत रवी राणा हे हजारो भाविक भक्तांसह श्री महाकाल मंदिर प्रांगणात येतील,सकाळी ७.१५ ला राणा दाम्पत्याच्या हस्ते महापूजा व अभिषेक होईल,९ वाजता कलश पूजन केले जाईल आणि ९.१५ वाजता श्री महाकाल मंदिरातील पुजारी व ट्रस्टी हे सर्व कलश विधिवत पूजन करून आमदार रवी राणा_खासदार सौ नवनीत रवी राणा यांच्या डोक्यावर ठेवतील हे सर्व मंगलमय कलश आपल्या डोक्यावर घेवून आमदार रवी राणा व खासदार सौ नवनीत रवी राणा मंदिर परिक्रमा करतील,ठीक १० वाजता हे कलश भक्ती शक्ती रथावर ठेवले जातील,या ठिकाणी आमदार रवी राणा व खासदार सौ नवनीत रवी राणा हे संत महंत आणि मान्यवरांचा सत्कार करतील आणि उपस्थित भाविक भक्तांना संबोधित करतील,ठीक ११,३० वाजता १५ दिवस चालणारी ही रथयात्रा इंदोर मार्गे ओंकारेश्वर कडे प्रयाण करेल, इंदोर,ओंकारेश्वर,खंडवा असे नगरभ्रमन करीत ही रथयात्रा अमरावती जिल्हातील धारणी येथे प्रवेश करेल ज्याठिकाणी आदिवासी बंधू भगिनी या रथयात्रेचे भव्य स्वागत करतील,ही रथयात्रा संपूर्ण अमरावती जिल्ह्यात फिरणार असून धारणी, चिखलदरा, परतवाडा, अचलपूर, अंजनगाव सूर्जी,दर्यापूर, भातकुली, तिवसा, चांदुर बाजार, बडनेरा अमरावती असे १३ दिवस भ्रमण करून दिनांक १५ डिसेंबर ला जिल्हा स्टेडियम अमरावती येथून निघणाऱ्या शिवमहापुराण कथावाचक श्री प्रदीपजी मिश्रा यांच्या कलश यात्रेत सामील होईल.हनुमान गढी अमरावती येथे हनुमान चालीसा चॅरिटेबल ट्रस्ट व आमदार रवी राणा_खासदार सौ नवनीत रवी राणा यांच्या वतीने १६ डिसेंबर ते २० डिसेंबर आयोजित श्री प्रदीपजी मिश्रा यांच्या शिवमहापूराण कथेच्या अनुषंगाने या कलश यात्रेचे आयोजन करण्यात आले असून ज्या महिला भगिनी अमरावती येथील कलश यात्रेत सहभागी होतील त्या सर्वांची कथा स्थळी बसण्याची विशेष,आणि उत्तम व्यवस्था करण्यात येणार आहे.

आमदार रवी राणा व खासदार सौ नवनीत रवी राणा यांच्या उज्जैन दौऱ्याची उत्सुकता सर्व मध्यप्रदेश वासियांना असून इंदोर व उज्जैन शहरात विविध ठिकाणी स्वागताचे शेकडो फ्लेक्स लागले असून भगव्या झेंड्यानी वातावरण धार्मिक झाले आहे,आमदार रवी राणा व खासदार सौ नवनीत रवी राणा यांचे न भूतो न भविष्यती असे स्वागत मध्यप्रदेशवासी करणार आहेत.या सर्व कार्यक्रमाचे नियोजन आणि पूर्वतयारीसाठी दिनेश सेठीया,जिल्हाध्यक्ष जितु दुधाने,खाजगी सचिव अविनाश काळे,सोशल मीडिया प्रभारी खुश उपाध्याय आदी गेल्या ४ दिवसापासून इंदोर,उज्जैन येथे मुक्कामी असून जातीने प्रत्येक तयारीवर लक्ष ठेवून आहेत.

## बदलत्या वातावरणाचे परिणाम आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे

# सर्दी अन् खोकल्यामुळे अमरावतीकर बेजार

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

गेल्या महिनाभरापासून शहरातील वातावरणात सातत्याने बदल होत असल्याने रुग्णसंख्येत वाढ नोंदविण्यात आली आहे. सध्या शहरात सर्दी, खोकला, तापाची साथ असून अपचनाचे विकार आणि हात-पाय दुखण्यामुळे नागरिक त्रासले आहेत. त्यामुळे खासगी आणि सरकारी रुग्णालयांतील रुग्णांच्या संख्येत ३० टक्क्यांनी वाढ झाल्याचे निरीक्षण डॉक्टरांनी नोंदविले आहे.

गेल्या चार दिवसांपासून सकाळी आणि सायंकाळी गारवा जाणवत आहे. हे वातावरण सर्दी, खोकला, ताप आणि अपचन यांसारख्या



आजारांसाठी पोषक ठरत आहे. सर्दी, ताप, खोकला, जुलाब आणि उलट्यांनी मुले हैराण झाली आहेत. त्यामुळे मुलांना थंडीच्या ठिकाणी नेणे टाळावे, आजारी व्यक्तींचा सहवास टाळावा, आजारी असल्यास मुलांना शाळेत पाठवू नये.

**ताप गेल्यावरही खोकला कायम**

घरातील एका व्यक्तीला संसर्ग झाल्यास त्याची लागण अन्य मंडळींनी होत आहे. काही रुग्णांना ताप कमी झाल्यानंतरही खोकला आणि घसादुखीचा त्रास जाणवत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या वातावरणाचा त्रास लहान मुलांनाही होत आहे.

**हा होतोय त्रास**

वातावरणातील बदलांमुळे अंगदुखी, डोके दुखणे, सर्दी, खोकला, सतत शिका येणे, घसादुखी आदी त्रास होत आहे. थंडीच्या दिवसांमध्ये ॲलर्जी होण्याची शक्यता असते, त्यामुळे शिका येतात. सध्या वातावरणातील बदलामुळे रुग्णसंख्या वाढली आहे.

# मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळासाठी शासन हमी वाढविली

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळासाठी शासन हमी वाढवून ५०० कोटी रुपये इतकी करण्याच्या प्रस्तावास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. सध्या ३० कोटी रुपये इतकी शासन हमी देण्यात येते. या शासन हमीचा कालावधी ८ वर्षाचा राहील.

या महामंडळाकडून मुदतकर्ज तसेच डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज तसेच सूक्ष्म पतपुरवठा केला जातो. या योजना केंद्राच्या निकषानुसार राबविण्यात येतात. राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास एवं वित्त निगम, नवी दिल्ली यांच्याकडून कर्ज घेण्यासाठी महामंडळास ३० कोटी इतकी शासन हमी राज्य शासनाने दिली आहे. या हमी पोटी वित्त विभागास २ टक्के व्याज देण्यात येते. महामंडळाने वित्त निगमकडून आतापर्यंत ११० कोटी ३४ लाख इतके कर्ज घेतले असून ८० कोटी ९५ लाख इतकी परतफेड केली आहे.

महामंडळाकडून लाभार्थीला ३० लाखापर्यंत कर्ज देण्यात येते. आतापर्यंत या वर्षात २४५४ अर्ज प्राप्त झाले आहेत. मात्र, महामंडळाकडील निधीच्या कमतरतेमुळे सरसकट सर्व लाभार्थींना ३ लाख २० हजार इतकेच कर्ज मंजूर करण्यात आले आहे. त्यातून त्यांचे व्यवसाय सुरु करणे अशक्य आहे. त्यामुळेच तत्कालिन वित्त मंत्री तथा उपमुख्यमंत्री यांनी अर्थसंकल्पीय भाषणात या महामंडळासाठी पुरेशी तरतूद करण्याची घोषणा केली होती.